सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या

# संतपीठ समितीचा अहवाल

T4(Q).2315.N8t
M3

T4(Q).2315.N8t
M3
228233

त्र्यं. शि. भारदे
अध्यक्ष
संतपीठ समिती

# । संतपीठ ।

## संतपीठ समितीचा अहवाल

# अनुक्रमणिका


प्रकरण पहिलेः प्रास्ताविक

प्रकरण दुसरे : संतांचे समाजकारण

प्रकरण तिसरे : शिक्षण आणि जीवनमूल्ये

प्रकरण चवथे : संतपीठ : उद्दिष्टे आणि स्वरूप

प्रकरण पाचवे : अभ्यासक्रम व परीक्षा

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील जनतेची मागणी लक्षात घेऊन पैठण येथे संतपीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला व २३ मार्च १९८१ च्या निर्णयाने संतपीठाबद्दल शिफारशी करण्यासाठी समिती नियुक्त केली. बॅ. अंतुले मुख्यमंत्री असताना ही समिती नियुक्त करण्यात आली. त्यानंतरच्या काळात या कार्यास चालना मिळाली नाही. श्री. वसंतराव दादा पाटील हे मुख्यमंत्री झाले व श्री. सुधाकरराव नाईक हे शिक्षणमंत्री झाले. त्यांनी समितीची २६ ऑक्टोबर ८३ च्या प्रस्तावाने पुनर्घटना करून कार्यास पुनश्च चालना दिली. या समितीत पुढील सभासद आहेत.

**समिती**

| | |
|---|---|
| *१] श्री. बाळासाहेब भारदे* | *अध्यक्ष* |
| *२] श्रीमती निर्मलाताई देशपांडे* | सदस्य |
| *३] श्री. रायभान जाधव, औरंगाबाद (विधान सभा सदस्य)* | सदस्य |
| *४] श्री. पांडुरंगराव डिंगरे, पंढरपूर (विधान सभा सदस्य)* | सदस्य |
| *५] प्रा. यू.म. पठाण, औरंगाबाद* | सदस्य |
| *६] प्रा. पुंडरिक धुमाळे, पुसद* | सदस्य |
| *७] डॉ. गंगाधर पानतावणे, औरंगाबाद* | सदस्य |
| *८] प्रा. राम शेवाळकर वणी* | सदस्य |
| *९] श्री. बाळासाहेब पाटील, पैठण* | सदस्य |
| *१०] डॉ. दादामहाराज मनामाडकर, पंढरपूर* | सदस्य |
| *११] डॉ. सरोजिनी बाबर, पुणे* | सदस्य |
| *१२] शिक्षण सहसंचालक, पुणे* | सदस्य-सचिव, |

## भूमिका

एकनाथांची सामाजिक समता व शिवाजी महाराज व महात्मा गांधी यांचा सर्वधर्मसमभाव यावर आधारित संतपीठाची स्थापना करण्याबाबत ही समिती शासनास शिफारस करील. तसेच जगातील धर्म आणि तत्वज्ञान, जगातील संतांचे जीवन व कार्य आणि भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील संतांचे तत्वज्ञान याचा तौलनिक अभ्यास इत्यादिबाबत ही समिती विचार करील'' असे शासनानें संतपीठाच्या घोषणेच्या संदर्भात २३ मार्च १९८१ च्या सरकारी प्रस्तावाने घोषित केले. संतपीठाच्या संकल्पाची शासनाची ही घोषणा महाराष्ट्रातील जनतेला अत्यंत संतोषजनक वाटेल यात शंका नाही. या निर्णयाबाबत महाराष्ट्राचे कर्तबगार व सर्वधर्म समभावी माजी मुख्यमंत्री याना महाराष्ट्र धन्यवाद देईल. संतपीठाच्या कल्पनेचा मी कैक वर्षे आग्रहाने पुरस्कार करीत आलो असल्याने या समितीचे अध्यक्षपदही मला भाग्याने लाभले ही संतकृपाच होय. असो

पहिल्या प्रथम नियुक्त झालेल्या समितीमध्ये विचार विनिमय करून संतपीठाच्या संकल्पनेचा आराखडा अध्यक्ष या नात्याने मी प्रसिध्द केलाच होता. समितीची पुनर्घटना झाल्यावर या समितीने त्या आराखड्याच्या बाबतीत काही सूचना केल्या. आमच्या या समितीत सर्वादरास पात्र असलेले साहित्यिक संतभक्त आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. संतपीठ संकल्पनेचा थोडक्यात ढोबळ पण सारग्राही आराखडा आपण प्रसिध्द करावा, या विषयामध्ये रस असलेल्या जाणकार व तज्ञ लोकांचे त्यावर अभिप्राय घ्यावेत, लोकांकडूनही सूचना मागवाव्यात व मग संतपीठ संकल्पनेचा सांगोपांग विचार करून संतपीठ संकल्पनेचे तपशीलवार प्रारूप समितीच्या वतीने शासनाला सादर करावे असे आम्ही योजिले व त्यानुसार संतपीठाची संकल्पना हा प्राथमिक आराखडा आम्ही प्रसिद्ध केला. तो पुढे दिला आहे.

## संतपीठाची संकल्पना

संतदर्शनाबाबत अगदी साररूपाने सांगावयाचे तर आत्मोध्दार आणि लोकोद्धार यांचा संगम त्यानी केला, विश्वाला माया न मानता त्यांनी

विश्वब्रम्हची केले. सर्वांच्या ठायी ईश्वर हे ठसविण्यासाठी त्यानी 'सर्वेश्वर' ही उपास्य देवता मानली. 'हे समस्त श्री वासुदेव' अशी प्रचीती देऊन भक्तांमध्ये राव आणि ज्ञानिया तोचि असा ज्ञानभक्तीचा समन्वय त्यानी करून दाखविला. भक्ती म्हणजे देवालयातील भक्ती नसून सर्वाभूती समदृष्टी' हेची भक्ती गोड. मोठी' अशी लोकभक्तीची दीक्षा दिली, भजन करणारांना त्यांनी 'जन हेचि जनार्दन । एका जनार्दनी भजन । अशी व्याख्या शिकविली, रंजल्या गांजल्यांशी ममतेने वागणारा 'तोचि साधु ओळखावा' असा त्यांनी स्पष्ट संकेत केला. परमार्थ सिध्द झाला तरी तेयाही कर्तव्य उरले लोकालागी। असे सांगून त्यांनी साधनेला सेवेची जोड दिली, मुख्य हरिभजन दुसरे राजकारण आणि तिसरे सर्वविषयी सावधपण असा बोधपाठ देऊन संतांनी अध्यात्मिक समाजकारणाचा पाया घातला, अनेक धर्माधर्माच्या विकृत कल्पनेच्या नादी न लागता हे धर्माधर्म किटाळ त्यास अज्ञान हे मूळ। म्हणून त्यजिजे सकळ धर्मजात असे सांगून संतानी सर्व धर्म समभावाची मुहूर्तमेढ रोवली, ब्राह्मणाने महाराचा बाप काढताच 'तुमचे आमचे बाप एक हाय' असे ठणकावून उत्तर देण्याची प्रेरणा संतांनी दिली. रामरहिम एक आहे हे संतांनीच लोकमनावर बिंबविले, सर्वजाति धर्माचे लोक भक्तभागवत होऊन साधू सिध्द होऊ शकतात याचा प्रत्यय विशेषतः महाराष्ट्र संतानी जगास दाखविला.

असावे भलतिया व्यापारी। लक्ष सर्वेश्वरी ठेवोनिया' या न्यायाने श्रद्धा बुध्दीने आपण प्रपंच केला तरी तो परमार्थ होऊ शकतो असा विश्वास संतांनी सामान्य प्रापंचिक लोकामध्ये निर्माण केला. पारंपारिक धर्मरुढीवर आधारलेल्या जातिधर्मापेक्षा अध्यात्मिक, भाविक भक्ती धर्म श्रेष्ठ आहे असे त्यानी पटविले आणि भक्ती येथ सारे। जाती अप्रमाण असा पुरोगामी उद्घोष त्यांनी केला, वरिष्ठ वर्ण भाषेची मक्तेदारी दूर करून मराठमोळ्या जनतेसाठी त्यांनी मराठी साहित्य निर्माण केले आणि एकंदरीने एकट्या दुकट्याला वैकुंठात नेणाऱ्या वैयक्तिक धर्म साधनेच्या ऐवजी याच जगात वैकुंठ केले आघवे। हा साक्षात्कार त्यांनी दाखविला. संतदर्शनाचे हे सार आहे. देशकालपरिस्थितीच्या संदर्भातील एकाद दुसऱ्या दृष्टांताच्या आधारे संतांच्या आध्यात्मिक मानवतेच्या सिध्दांताचे महत्व कमी करता येणार नाही. वैयक्तिक अनासक्त आत्मोध्दारसाधना आणि सामाजिक भूतदयाशील

लोकोध्दारसाधना हेच संतपरंपरेच्या अध्यात्मिक मानवतावादाचे रहस्य आहे. महाराष्ट्र संतांचा इतिहास प्रतिगामी पांडित्य व पुरोगामी साधुत्व यांच्या संघर्षाची आठवण करून देणारा आहे. जातिभेदरूपी विंचू त्यांनी मारला नाही याबद्दल दुमत होऊ शकेल परंतु त्या विंचवाची उच्चनिचत्वाची विषारी नांगी संतानी तोडून टाकली असे सार्थपणे म्हणता येईल. अध्यात्मिक दिव्यता, नैतिक मानवता आणि अंतर्बाह्य समता असा त्रिवेणी संगम म्हणजे संतदर्शन !

### संतपीठाची आवश्यकता

हा संत बोध लक्षात घेता आजही या दर्शनाची किती आवश्यकता आहे हे निराळे सांगण्याची जरूर नाही. अनेक ठिकाणी आज नीतीधर्माची जागा जातिधर्माने घेतली आहे. एकाच ईश्वराची भक्ती करणारे भक्त जातिधर्मपंथाच्या नावावर समाजाला विभक्त करून राहिले आहेत. सत्ता संपत्ती व विलास यांची वाढती भोगलालसा मानवी मुल्यांवर आघात करून समाजरचनाच खिळखिळी करून राहिली आहे. भौतिक प्रगतीबरोबरच नैतिक अधोगति वाढत आहे. जग सुधारत आहे पण माणूस बिघडतो आहे, असे दृश्य अनेक ठिकाणी दिसते आहे, वाढत्या प्रमाणात भ्रष्टाचार व अत्याचार दिसून येत आहेत, महालात लोळणारे कुबेर आणि हालात होरपळणारे गरीब यांच्यामधील दरी वाढत आहे. आणि एकंदरीने मानव समाजाचे भवितव्यच धोक्यात येऊ पहात आहे हे कटू सत्य आहे. ही माणूसकी जागवावयाची असेल तर माणसाच्या मनावर योग्य संस्कार केले पाहिजेत, समाजाशी आपले खरेखुरे नाते काय आहे याचे ज्ञान त्याला झाले पाहिजे. प्रसन्न जीवन व प्रसन्न मरण सिध्द करणारे जीवनदर्शन त्याला झाले पाहिजे. नैतिक मुल्याबद्दलची निष्ठा वृद्धिंगत केली पाहिजे राष्ट्रीय व सामाजिक कर्तव्याची दीक्षा त्याला लाभली पाहिजे, पशुतेपासून दिव्यतेकडे नेणारी आपली मानवता आहे हे सत्य मानवाला उमगले पाहिजे आणि आत्महितासाठी व लोकहितासाठी मानवाला पात्र बनविले पाहिजे.

त्याबरोबरच आर्थिक, सामाजिक विषमतेचे निराकरण करण्यासाठी समाजाबद्दल सहानुभूति भूतदया या दीनोद्धारक व सर्वात्मक प्रेरणा सुदृढ केल्या पाहिजेत आणि आत्मौपम्य बुध्दीने राष्ट्रीय व सामाजिक एकात्मता सिध्द करण्यासाठी सर्वांना कटीबध्द केले पाहिजे. सर्व विचारवंतांना व

लोकहितैषी सज्जनांना या गोष्टी मान्यच आहेत. राष्ट्रीय नेते व समाजसेवक त्या दृष्टीने प्रयत्नही करीत आले आहेत. समाज विकासासाठी शिक्षण, सामुदायिक सुखसोयी, कृषि उद्योग सुधारणा, कलाबुध्दी, दारिद्र्यनिवारण योजना असे अनेक उपक्रम सर्वत्र चालू आहेत. तथापि माणसांचे मन चांगल्या प्रकारे कसे तयार करावे ही मूलभूत प्रक्रिया या सर्व उपक्रमातून दिसत नाही. शिक्षणाचा भर चातुर्यावर आहे, चारित्र्यावर नाही, कलांचा भर रंजनविलासावर आहे मनोविकासावर नाही, समाजविकासामुळे विकास होतो आहे पण समाज जैसेथेच आहे, राष्ट्रीय संपत्तीत वाढ होते आहे पण सामाजिक आपत्ती वाढत आहेत. सार रूपाने सांगावयाचे तर भौतिक विकासाला नैतिक मूल्यांची जोड नसल्याने मूठभर वरिष्ठ वर्गाला त्या विकासाचा लाभ होते आहे. आणि सर्व सामान्य लोकांचे हाल होत आहेत आणि ज्याना सत्तासंपत्तीचा लाभ आहे तेही बैचेन आहेत असे चित्र आहे. म्हणूनच मनावर संस्कार करण्याच्या प्रक्रियेला प्राधान्य दिल्याशिवाय हे चित्र बदलणार नाही. अध्यात्मनीतीच्या अधिष्ठानाशिवाय राजनिती, अर्थनिति आणि समाज शांती सफल होणार नाही. हे अधिष्ठान संतदर्शन देऊ शकेल.

धनाचा विकास अर्थकारण करू शकते, जनाचा विकास राजकारण करू शकते पण मनाचा विकास अध्यात्मिक धर्मकारणच करू शकते. मन सुधारेल तर जन सुधारेल या न्यायाने मनावरील संस्कार हा समाजरचनेचा पाया आहे. हा पाया मजबूत करण्याचे कार्य संताचा अध्यात्मिक मानवधर्मच प्रभावीपणे करील या जाणीवेनेच संत दर्शनाकडे लोक आशेने व श्रध्देने पहात आले आहेत. वैयक्तिक सद्वर्तन आणि सामाजिक परिवर्तन यांचा समन्वय म्हणजेच नवसमाजनिर्मिती आहे. हे कार्य संत प्रेरणाच करू शकेल. बऱ्याच देवभक्तांचे सद्वर्तनाकडे लक्ष आहे पण समाजपरिवर्तनाचा ते विचारही करीत नाहीत आणि बऱ्याच देशभक्तांचे समाजपरिवर्तनाकडे लक्ष आहे पण स्वतःच्या वर्तनाकडे नाही. त्यामुळे देवभक्ती आणि देशभक्ती दोन्हीं दांभिक ठरत आहेत. म्हणूनच विश्वात्मक देवाच्या खऱ्याखुऱ्या भक्तिभावातून देवभक्ती, देशभक्ती व विश्वभक्ती साधेल, आणि आत्मकल्याण व विश्वकल्याण यांचा समन्वय होईल. मानसिक शांति आणि सामाजिक क्रांति दोन्हीची एक समयावच्छेदेकरून दीक्षा देणारे संतदर्शन प्रभावी व्हावे आणि त्यायोगे

सामाजिक समता, एकात्मता व परिवर्तनशील मानवता याना प्रभावी चालना मिळावी ही काळाची गरज आहे व त्यासाठीच संतपीठाची आवश्यकता आहे. या संतपीठाच्या कार्यामुळे धर्माला मानवधर्माची, विज्ञानाला विवेकाची, साधनेला सेवेची, योजनेला प्रेरणेची, प्रकल्पाला संकल्पाची, जीवनाला समर्पणाची, आचाराला सदाचाराची, आणि व्यक्तिजीवनाला सामाजिक कर्तव्याची जोड देणे अधिक सुकर होईल.

संतदर्शनाचा मागोवा घेऊन सद्‌गुणसंवर्धन, भूतदया, त्याग, संयम, कर्तव्यनिष्ठा, अनासक्ती इत्यादि वैयक्तिक गुणविकास आणि मानवता सामाजिक समता, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकात्मता, परोपकार दीनोध्दार मानवधर्मजागृती यांच्या आधारावर समाजविकास करणे हे संतपीठाचे मुख्य कार्य आहे.

## शिक्षापीठ आणि दीक्षापीठ

संतपीठाची संकल्पना इतर विद्यापीठापेक्षा निराळी आहे. केवळ काही विषयांच्या पुस्तकी वा बौध्दिक शिक्षणावर भर देणारी अनेक विद्यापीठे आहेत. त्या संख्येत भर घालण्यासाठी ही संकल्पना नाही. मुख्यतः संतपीठ हे समाजशास्त्राचे शिक्षापीठ नसून समाजसेवेचे दीक्षापीठ आहे. याचे प्रत्यंतर संतपीठाच्या कार्यामुळे जनताजनार्दनास आले पाहिजे अशी आमची धारणा आहे. आपले जीवन केवळ वैयक्तिक उपभोगासाठी नसून सामाजिक उपयोगासाठी आहे ही जाणीव निर्माण व्हावी विषयसुखापेक्षा आत्मसुखाची थोरवी सर्वांना पटावी, पारंपारिक संकुचित धर्मकल्पनांचा फेरविचार करून जातिवर्गपंथ निरपेक्ष मानवधर्माची दीक्षा द्यावी, सामाजिक समतेसाठी लोक मानसाची सिध्दता करावी, संतसाहित्याची पारंगतता हस्तगत करावी, सर्वधर्मातील संतमहात्म्याची भूमिका समजावून द्यावी, सर्वधर्म समभावाची वृत्ति वाढवावी वैयक्तिक मुक्ती साधनेच्या द्वारे मानवमुक्ती सफल करावी, रंजल्यागांजल्या गरीबांच्या सेवेची प्रेरणा प्रभावी करावी लोकजागृती व धर्मजागृती यावर भर देणार यंत्रणा उभी करावी. सर्व धर्मातील, संतवृत्तीच्या धर्मप्रचारकांची विधायक फळी तयार करावी, प्रवचन, भजन, कीर्तन कलांची अभिवृध्दि करावी आणि एकंदरीने या सर्व प्रयत्नांतून मानवधर्म संस्थापना साकार करण्यास यथाशक्ती सहाय्यीभूत व्हावे अशी संतपीठाकडून अपेक्षा आहे.

जनाना सज्जन बनवावे सज्जनांना साधक बनवावे व साधकाना समाजसेवक बनवावे ही संतशिकवण संतपीठातून प्रतिबिंबित व्हावी अशी ही संकल्पना आहे. महाराष्ट्रातील ज्ञानोबा ते विनोबा या संतपरंपरेचा वारसा पुढील पीढीनें चालवावा यासाठी त्याना तयार करणे हे संतपीठीचे कार्यसूत्र आहे.

## नीतिधर्म संस्कार

या भूमिकेच्या आधारे मुख्यतः शिक्षणक्षेत्राच्या संदर्भात काय करता येईल स्वतंत्र विशेष असे कोणते कार्यक्रम हाती घेता येतील व उद्दिष्ट पूर्तीला अनुसकरून ते कसे कार्यान्वित करता येतील याचा विचार करणे प्रस्तुत ठरेल. शिक्षणक्षेत्रात नैतिक शिक्षणाचा समावेश व्हावा हा विचार बळावत आहे त्यासाठी पूर्वी शासकीय पातळीवर समित्याही नियुक्त करण्यात आल्या होत्या. आमच्या धर्मातीत राज्यकल्पनेमुळे (सेक्यूलॅरिझम) धर्मशिक्षण हा शब्द वापरणे अेनकाना इष्ट वाटत नाही. कारण धर्म शब्दाने हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन अशा धर्मपंथांचा बोध होतो म्हणूनच धर्मशिक्षणाऐवजी नैतिक शिक्षण हा शब्द राजमान्य झाला आहे. वस्तुतः सर्व धर्माचा नीतिबोध एकाच स्वरूपाचा आहे. धर्मपंथाव्या तत्वज्ञानात काही मतभेद आहेत. व उपासना वा आचार पध्दतीही आहेत. पण सर्वधर्माचा तपशील भिन्न असला तरी शील एकच आहे आणि नीतिनियमाबद्दल तर जवळजवळ एकवाक्यताच आहे. म्हणून सर्वधर्मातील सर्वप्रेषितांची नीतिवचने व उदाहरणे या नैतिक शिक्षणात चांगल्या प्रकारे समाविष्ठ करता येतील.

शासनाने नैतिकशिक्षण (मॉरल एज्युकेशन) शिक्षण क्रमात समाविष्ट करावयाचे ठरविले तर संतपीठाला सर्व शैक्षणिक पातळीवर प्रभावी काम करता येईल कारण खऱ्या अर्थाने संतपीठ हे नीतिविद्यापीठच आहे असे हे नीति संस्कार लहानपणापासूनच देणे इष्ट असल्यामुळे संत पीठाला प्राथमिक माध्यमिक उच्च अशा सर्व स्तरातील शिक्षण क्षेत्रात कमी-अधिक प्रमाणात छात्रसंस्काराच्या दृष्टीनें काम करता येईल.

हा आराखडा अनेक संबंधित विचारवंतांना सादर करण्यात आला. काही विचारवंतांशी त्याबाबत समिती सदस्यांनी विचारविनिमय केला. आमच्या समितीच्या सदस्यांनी या कामात आत्मीयतेने, चिकित्सकपणे व परिश्रमपूर्वक रस घेतला. आपल्या सूचना लेखांकित करून टिप्पण्या सादर केल्या आणि सर्वांच्या विचारविमर्शातून आमचा अहवाल तयार झाला.

पैठण येथे संतपीठ होणार असल्याने पैठण येथे निदान दहावीस एकर तरी जागा त्यासाठी राखून ठेवावी व तेथे संतपीठाचा फलक लावावा म्हणजे त्या कार्यास भाविक व चिकित्सक लोकांचा प्रतिसाद व चालना मिळेल अशी सूचना समितीने शासनाकडे सुरवातीलाच केली. शासनाने या सूचनेस मान्यताही दर्शविली होती. पण अजूनपर्यंत त्याबाबत पूर्तता झाली नाही. आता अहवालानंतर ही पूर्तता होईल असा समितीला विश्वास वाटतो.

समितीने आपापल्या परीने अहवाल सर्वतोपरी चांगला व्हावा असा प्रयत्न केला आहे असे आम्हास प्रामाणिकपणे वाटते. हा अहवाल १९८६ च्या सुरवातीलाच तयार झाला. त्यानंतर २५।४।८६ रोजी माननीय मुख्यमंत्री यांना समितीचा अध्यक्ष या नात्याने मी पत्र दिले. त्यातील महत्वाचा भाग पुढे दिला आहे.

*"संतपीठाबाबत शिफारशी करण्यासाठी शासनाने माझ्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली. त्यासमितीचा अहवाल पुरा झाला असून तो शासनास सादर करण्यात येईल.*

*पैठण संतपीठाबाबत आपणाशी विचारविनियमय करण्याची अहवाल सादर करण्यापूर्वी संधि मिळावी अशी माझी उत्कट इच्छा होती व त्यानुसार आपण आजची वेळ दिली याबद्दल मी कृतज्ञ आहे.*

*पैठण येथे ज्ञानेश्वर उद्यानासमोरील २० एकर जमीन या संतपीठासाठी देण्यात येईल असे आश्वासन शासनाने दिले होते व अहवाल तयार करण्याच्या अगोदर ती जमीन जाहीर झाली तर त्याच्या आधारावर संतपीठाच्या संकल्पित बांधकामाबाबत निश्चित चित्र देता आले असते. त्याची पूर्तता झाली नाही. आपण कृपया संतपीठासाठी संकल्पित जमीन राखून ठेवून जाहीर केली तर पुढील कार्यवाही सुकर होईल.*

*हे संतपीठ सरकारवर कमीत कमी आर्थिक बोजा पडावा व स्थानिक संतक्षेत्राच्या परिसरात त्याची केंद्रे व्हावीत असा आमचा हेतु आहे. मोझरी, शेगाव, आळंदी, पंढरपूर, शिर्डी अशा गावी ज्या ठिकाणी इमारती आहेत, वातावरण अनुकूल आहे व अध्यात्मभक्तीच्या आधारे समाजप्रबोधन करणारे संत सज्जन आहेत तेथे या विद्याशाळा काढाव्यात व त्या पैठणच्या संतपीठाला संलग्न कराव्यात अशी कल्पना आहे. म्हणून मुख्य खर्च पैठण येथील संतपीठाच्या मध्यवर्ती केंद्राबाबतच आहे. पैठण केंद्रबिंदू मानून महाराष्ट्रातील संतस्थानक्षेत्रात अशा विद्यालयाचे जाळे विणता येईल. विद्यापीठाचे अंदाजपत्रक (मराठवाडा) दोनतीन कोटी रुपयाचे आहे व एका कॉलेजचा खर्च साधारणपणे सात आठ लाख रुपये आहे. संतविद्यालयाचा खर्च एक लाख रुपयाच्या आतच यावा असा आमचा अंदाज आहे. साधारणतः पैठणचा संतपीठ मुख्य केंद्राचा खर्च २० लाख रुपये येईल व संलग्न कॉलेजचा खर्च प्रत्येक १ लाख रुपये येईल असा अंदाज आहे अर्थात निधि उपलब्ध होईल त्या प्रमाणे कामाचे नियोजन करता येईल.*

*श्री सत्यसाईबाबाप्रेरित विद्यापीठ प्रस्थापित झाले आहे व त्याला डीम्ड युनिव्हर्सिटी दर्जा मिळाला आहे. तेथील अभ्यासक्रमाचा आपल्या परिस्थितीशी सुसंगत असा अभ्यासक्रमही चांगल्या रीतीने कार्यान्वित करता येईल, पदव्यूत्तर एक दोन वर्षाचा अभ्यासक्रम आम्ही गृहीत धरला आहे.*

*आपल्या सूचना विचारात घेऊन या संतपीठाची संकल्पना साकार करण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्नशील राहू.”*

या पत्रावरून समितीची भूमिका स्पष्ट होईल.

शासनाने समितीस मुदतवाढ न दिल्याने समितीचे अस्तित्वच कायदेशीर रीतीने संपुष्टात आले.

अहवाल तयार जरी झाला तरी तो शासनाने मुद्रित करावयाचा की समितीने तो मुद्रित करून शासनास द्यावा याबाबत शासकीय निर्णय लवकर झाला नाही.

शासकीय निर्णय व आर्थिक तरतूद याची फारशी वाट न पहाता हा अहवाल मुद्रित करून शासनास सादर करावा असे ठरवून हा मुद्रित अहवाल समितीच्या वतीने शासनास मी सादर करीत आहे.

या अहवालात दुसऱ्या प्रकरणात संतांच्या समाजकारणाच्या परामर्श घेण्यात आला आहे. तिसऱ्या प्रकरणात राष्ट्रिय शिक्षण आयोगाने केलेल्या शिफारशींचे सार देऊन संतपीठाकडून हे पूरककार्य प्रभावीपणे होईल हे विशद करण्यात आले आहे. चवथ्या प्रकरणात संतपीठाची उद्दिष्टे व अपेक्षा याबाबत विषय मांडण्यात आले आहेत. पाचव्या प्रकरणात संतपीठाच्या अभ्यासक्रमाचा आराखडा देण्यात आला आहे. याअहवालातील शिफारशी विनाविलंब आणि व्यवहार्यतेने अंमलात आणता येतील, या दृष्टीनेच करण्यात आल्या आहेत असे आम्हास वाटते.

या दृष्टीने काही गोष्टी तातडीने होणे आवश्यक आहे असे समितीस वाटते. पैठणला संतपीठ स्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहेच. त्यासाठी दहावीस एकर जमीन तरी पैठणक्षेत्रात शासनाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. समितीने सुरवातीलाच ही सूचना शासनाला केली होती. शासनाने त्यास तत्वतः मान्यताही दिली होती. समितीने ज्ञानेश्वर उद्यानच्या समोरील जागाही त्यासाठी पाहिली होती व संबंधीत अधिकाऱ्यांनीही त्याबद्दल कार्यवाही करण्याचे ठरविले होते. आजपर्यंत ती कार्यवाही होऊ शकली नाही. तरी ती सत्वर व्हावी असे समितीला वाटते.

दुसरी गोष्ट ही की समितीने सरकारी खजिन्यावर जास्त भार पडू नये म्हणून कमीत कमी खर्चात संतपीठाला जास्तीत जास्त चालना कशी देता येईल याचा विचार करून शिफारशी केल्या आहेत. रूढ विद्यापीठाच्या संकल्पनेनुसार विद्यापीठासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात. ज्या मराठवाड्यात हे संतपीठ होणार आहे त्या मराठवाडा विद्यापीठाचा खर्च दीड दोन कोटी रुपयावर आहे. एका कॉलेजचा खर्च एकदीड लाख रुपयावर आहे. समितीने संतपीठाचे उद्दिष्ट तर सफल व्हावे आणि मर्यादित खर्चात ते शक्य व्हावे म्हणून त्यावरही शिफारशी केल्या आहेत. विशेषतः महाराष्ट्रात अनेक संतांनी पुनीत केलेली क्षेत्रे आहेत. तेथे अनेक धर्मशाळांच्या इमारती आहेत व संतदर्शनाचे प्रबोधन करणारे गुरूजनही आहेत. वारी यात्रा सोडून या इमारती बऱ्याचशा मोकळ्याच असतात. त्यांचा उपयोग व्हावा व वातावरणही अनुकूल असावे म्हणून पंढरपूर, आळंदी, देहू, मोझरी, शेगाव शिर्डी, नेवासा इत्यादि ठिकाणी संतपीठाचा संकल्पित अभ्यासक्रम

सुरू करणारी विद्यालये सुरू करण्यात आली तर सुरवातीलाच आठदहा महाविद्यालये निघू शकतील व प्रत्येक अशा महाविद्यालयाला एक लाख रुपये सुरवातीला खर्च होईल.

तिसरी गोष्ट ही की पैठणलाच संतपीठ करावयाचे शासनाने ठरविले असल्याने तेथे मुख्य मध्यवर्ती विद्यापीठ म्हणून विद्यापीठासाठी लागणाऱ्या काही किमान इमारती तयार कराव्या लागतील. त्यासाठी वीस लाख रुपयांची तरतूद करून सुरवातीला ४/५ लाख रुपयांची मध्यवर्ती इमारत उभी करावी लागेल व त्यानंतर बाकीचे बांधकाम हाती घेता येईल.

चवथी गोष्ट ही की संतपीठ हे मुक्त विद्यापीठाप्रमाणे घरी राहून संतपीठाचा अभ्यासक्रम पुरा करणाऱ्या ज्ञानेच्छू छात्रानाही बाहेरून परीक्षेस बसून पदवी प्राप्त करता येईल व त्यासाठी मार्गदर्शक आचार्यांची, अल्प मुदतीच्या शिक्षणबोधपाठांची व्यवस्था करता येईल.

पाचवी मोष्ट ही की, हा अहवाल शासनाने अभ्यासल्यानंतर त्याचा अधिक तपशीलवार प्रकल्प शिक्षण विभागाच्या व अन्य तज्ञांच्या विचार-विनीमयातून तयार करता येईल. मात्र त्याची वाट न पहाता शक्य तेथे वर सुचविल्याप्रमाणे संतपीठ महाविद्यालयांची सुरवात करणे श्रेयस्कर ठरेल.

संतपीठाची संकल्पना नवीन व वैशिष्ठ्यपूर्ण असल्याने चाकोरीतील शिक्षणतज्ञांव्यतिरिक्त शैक्षणिक तज्ञता आणि संतपीठाबद्दल आत्मीयता याचा समन्वय असणाऱ्या मंडळींची एक छोटी समिती शासनाने नियुक्त करावी व संतपीठाच्या कार्यास सत्वर चालना द्यावी असे समितीचे शासनास आवाहन आहे.

सुधारक संत एकनाथांची सामाजिक समतेची शिकवण, राजर्षि शिवछत्रपतींचा सर्वधर्मसमभावावर आधारलेला राजधर्म आणि महात्मा फुले व महात्मा गांधी यांचा शांतिशील मानवधर्म यांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात संतपीठ लवकर साकार होईल अशी समितीस खात्री आहे.

समितीचा अहवाल तयार करण्यासाठी आमच्या समिती-सदस्यांनी जे बहुमोल योगदान दिले त्याबद्दल मी आभारी आहे. विशेषतः अभ्यासक्रमाच्या बाबतीत मराठवाडा विद्यापीठाचे आदर्श प्राध्यापक व संतसाहित्याचे गाढे अभ्यासक श्री यू. म. पठाण यांनी बहुमोल शिफारशी केल्या आहेत. हे नमूद करणे जरूरीचे आहे. शिक्षणविभागाचे उपसचिव श्री. ज. बा. कुलकर्णी यांनी सातत्याने परिश्रमपूर्वक अहवालाच्या कामी योगदान दिले याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

हा अहवाल शासन विचारात घेईल व संतपीठाचा शासकीय संकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करील असा समितीला विश्वास आहे.

(त्र्यं. शि. भारदे)

अध्यक्ष

# प्रकरण दुसरे
## अध्यात्मिक मानवतावादी संतदर्शन

संतपीठाचा विचार करताना संतांच्या अवतारकार्याचा विचार संक्षेपाने कां होईना करणे अवश्य आहे. महाभारतात यक्षप्रश्न हे प्रकरण आहे. यक्षाने धर्माला प्रश्न विचारला "का दिक्" कोणती दिशा? धर्माने उत्तर दिले "सन्तो दिक्" संत हीच दिशा आहे. सागरामध्ये रस्ता नसल्याने कोणत्या दिशेने जावे असा प्रश्न नौका चालविणाऱ्या नावाड्यास पडला आणि दिग्दर्शनाचे यंत्र काम करीत नसेल तर दीपस्तंभाकडे पाहून त्याने नाव वल्हवीली तर तो किनाऱ्याला लागतो. त्याप्रमाणे जीवनप्रवाहात वा भवसागरात मार्गाभावी भरकटत चाललेली नाव संतांच्या दीपस्तभांकडे पाहून चालली तर जीवन पार करता येईल असा या प्रश्नोत्तराचा अर्थ आहे.

### संत म्हणजे अनुभूति आणि सहानुभूति यांचा संगम

संताची व्याख्या काय आहे? संत कोणाला म्हणावे याबद्दल विचारी लोकात दुमत नाही. अध्यात्मभक्तीने आत्मानंदाचा अधिकारी झालेला व सर्व भूतमात्राकडे दयार्द्र बुद्धीने पहाणारा तो संत ही व्याख्या सर्वमान्य होण्यासारखी आहे. ज्ञानभक्तीने साक्षात्कारी, आणि कर्माने परोपकारी अशी संतांची व्याख्या करता येईल. ज्ञान, भक्ती, योग व कर्म हे चार मार्ग आत्मसाधनेसाठी मानले गेले आहेत. पण ही साधना जर केवळ स्वतःच्या सिद्धीसाठी वा मोक्षासाठी असेल तर त्याला संत शब्द लागू पडत नाही. एकादा ज्ञानी असेल पण तो संत असेलच असे नाही, संत मात्र ज्ञानी असतोच. एकादा भक्त असेल पण तो संत असेलच

असे नाही, पण संत मात्र भक्त असतोच. तीच गोष्ट राजयोग कर्मयोगालाही लागू आहे. आत्मोद्धाराच्या वैयक्तीक साधनेला लोकोद्धाराची साधना जोडल्याशिवाय संतपणा सिद्ध होऊ शकत नाही. वैयक्तिक साधना आणि सामाजिक धारणा या दोन्हींचा समन्वय संतांच्या जीवन दर्शनात दिसून येतो. संत म्हणजे अनुभूति आणि सहानुभूती यांचा संगम संताचे तत्वज्ञान हे अध्यात्मिक आहे, यात संशय नाही. म्हणूनच काही लोकांना ते केवळ अध्यात्मिक आहे सामाजिक नाही असे वाटते व समाज-हिताच्या वा समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने त्याचा आता फारसा उपयोग नाही असे वाटते. आमच्या मते संताचे अध्यात्मज्ञान विश्वनिरपेक्ष नसून विश्वात्मक आहे आणि म्हणूनच त्यांचे तत्वज्ञान हे आत्मकल्याणकारी व लोककल्याणकारी आहे, हे सुज्ञ वाचकांनी समजून घेतले तर गैरसमजास जागा राहाणार नाही.

वस्तूतः भारतातील सर्व श्रेष्ठ वेदांत तत्वज्ञान हे सर्व जग ईश्वरमय आहे, ईश्वराने व्यापलेले आहे, "ईशावास्यमिदं सर्वं यत्कींचजगत्यांजगत्" असे प्रतिपादीत आले आहे. दरम्यानच्या काळात या वेदांत-तत्वज्ञानाचा विपर्यास करण्यात आला. "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या", ब्रह्म सत्य आहे आणि जग मिथ्या आहे, या संकल्पनेचा विपर्यास "जग जर मिथ्या आहे तर त्याच्याकडे लक्ष देण्याचे कारण नाही, आपण आपल्या वैयक्तिक मोक्षासाठी ज्ञान साधना करावी" असा झाला. त्यामुळे ज्ञानी, भक्त, योगी अशा अनेक थोर पुरुषांनीही जगाकडे लक्ष दिले नाही व केवळ पारमार्थिक व पारलौकिक सद्गतीसाठी वैयक्तिक साधना केली व जगाकडे वा शेजाऱ्याकडेही लक्ष दिले नाही. ते थोर पुरुष होते त्यांना महानंदाचा लाभ झाला हे खरे. पण लोकांना ते ज्ञान वा आनंद देऊ शकले नाहीत. भारत देश हा तत्वज्ञानाच्या बाबतीत जगात अग्रेसर देश आहे. इतर बाबतीत तो अनेक प्रगतीशील देशांच्या मागे असेल पण तत्वज्ञानात श्रेष्ठ आहे. परंतु जगातील विचारी मानवानाही श्रेष्ठ वाटेल असे तत्वज्ञान देणाऱ्या या देशात दैवी तत्वाकडे जेवढे लक्ष आहे तेवढे मानवी तत्वाकडे नाही, ही भारतीय तत्वज्ञानाच्या इतिहासाची शोकांतिका आहे. म्हणून पराकोटीचे ब्रह्मज्ञानी असणाऱ्या या देशात कोटी कोटी लोक अज्ञानी राहिले आहेत आणि अव्दैताचे तत्वज्ञान जगास देणाऱ्या या देशात महाजन हरिजन, पुरुष-स्त्री, हिंदु-मुसलमान

इत्यादि सामाजिक भेदावर आधारलेले भेसूर सामाजिक व्दैत देशाला अशांत बनवून राहिले आहे. जगाला मिथ्या समजून तत्वज्ञानी लोकांनी सामान्य लोकांना वाऱ्यावर सोडून निजानंदाची वाट धरली आणि तत्वज्ञानाचा तोंडाने जप करणाऱ्या पण वर्ण-जाति-वर्चस्वाच्या कल्पनेने पछाडलेल्या धर्म मार्तंडांनी व राजेमहाराजांनी एकात्मतेचे व समतेचे वातावरणही उत्पन्न होऊ दिले नाही ही भारतीय संस्कृतीची शोकांतिका आहे.

या चक्रव्यूहातून मुमुक्षूमानवाना सोडविण्यासाठी धर्मप्रवर्तक व संतमहात्मे पुढे आले. भगवान कृष्ण, भगवान बुद्ध, भगवान महावीर, भगवान नानक या मानवधर्मप्रणेत्यानी त्या त्या कालात धार्मिक व सामाजिक पुनरूज्जीवनाचा प्रभावी प्रयत्न केला. जगातही भगवान येशूख्रिस्त, महमंदपैगंबर या धर्मप्रवर्तकांनी तत्कालीन समाजाला मानवधर्माची दीक्षा दिली. ज्या महाराष्ट्राच्या संदर्भात ही संतपीठ संकल्पना आहे त्या आपल्या महाराष्ट्रात तर श्री. चक्रधर, ज्ञानदेवापासून ते ज्योतिबा गांधी विनोबा पर्यंत अध्यात्मिक मानवधर्माचे तत्वज्ञान विकसित होत गेले. साररूपाने त्याचा विचार करणे उचित ठरेल.

## विश्व ब्रह्मचि केले ।

जगाला मिथ्या समजून जगाची उपेक्षा करणाऱ्या विचारात महाराष्ट्रसंतानी परिवर्तन घडवून आणले. "सर्व खल्विंदब्रह्म." सर्वच जर ब्रह्म आहे तर जगही ब्रह्मच आहे मिथ्या नाही हा क्रांतिकारक सिद्धांत संतानी प्रतिपादून विश्वकारणाला वा समाजकारणाला अध्यात्मिक अधिष्ठान दिले. सोन्याचा अलंकार झाला म्हणून त्याचे सोनेपण जात नाही. त्याप्रमाणे ज्या ब्रह्मतत्वाचा जणू अलंकार हे विश्व आहे, त्याचे ब्रह्मपण जाणार नाही. "सोने अलंकारासी आले, सोनेपण काई गेले?" असा प्रश्न ज्ञानदेवानी विचारला आणि हे समस्त श्री वासुदेव। ऐसा प्रतीतिरसाचा ओतला भाव। तो भक्तामाजीराव। ज्ञानिया तोचि। सर्व भूतमात्र वासुदेव-स्वरूप आहे अशी प्रचिती ज्याला होते तो ज्ञानी व तोच भक्त अशी समर्पक व्याख्या त्यांनी केली. जगाकडे ब्रह्मभावाने पाहून वागणे हेच संतदर्शनाचे सार आहे. नाथांच्या शब्दात "जगब्रह्मरुप जाण हेच साधूचे लक्षण।" "जन हेचि जनार्दन। एका जनार्दनी भजन।।" तुकोबांच्या शब्दात "ऐसा ज्याचा अनुभव। विश्व देव सत्यत्वे।" "विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगल।।"

नामदेवांच्या शब्दात "त्रिश्री विश्वंभर कोंदलासे एक। भेदाचे कवतुक कैसे सांगा।।" ही वानगीदाखल उद्धृत केलेली संतवचने संतांच्या विचाराची साक्ष पटवतील. जगाला माया समजून जगाकडे पहाणाऱ्याने आपले डोळे मिटून मिटल्या डोळ्यांनी ब्रह्म पहाण्यापेक्षा उघड्या डोळ्याने जगाकडेच ब्रह्मभावाने पहाणे ही सर्वश्रेष्ठ साधना आहे, हाच संतांचा संदेश आहे. ज्या भागवत धर्माचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला त्या ज्ञानेश्वरांनी "उघडे परब्रह्म दावियले" अशी त्यांची ख्याती नामदेवांनी वर्णन केली आहे. सर्वांना माहित असलेली ज्ञानराजाची आरतीच सांगते की ज्ञानेश्वरांनी "प्रकट गुह्य बोले। विश्व ब्रह्मची केले। विश्व हे ब्रह्मच आहे हा महासिद्धांत विश्वाकडे व विश्वातील भूतमात्राकडे पहाण्याची भूतदयावादी वा मानवतावादी नवीन दृष्टि देत आहे यात शंका नाही. सर्व भूतमात्र ईश्वरस्वरूप आहे असा ज्ञानाचा सिद्धांत हृदयाने स्वीकारला की ज्ञानभक्ती एकत्र येतात. "ऐसी अनवछत्र समता। भूतमात्री सदयता। पालटू नोहे चित्ता कवणेवेळी। अशी ज्ञानीभक्ताची अवस्था असते व त्यालाच संत पदवी प्राप्त होते. विश्वब्रह्मवादी तत्वज्ञानामुळे भक्ती ही केवळ देवाची रहात नाही तर विश्वाची भक्ती म्हणून ती परिणत होते. "सर्वाभूती समदृष्टी। हेचि भक्ती गोड मोठी।" हे नामदेवांनी सांगितलेले भक्तीरहस्य आहे. "जे जे भेटिजे भूत। ते ते मानिजे 'भगवंत। हा तो भक्तीयोग निश्चित। जाण माझा।" सर्व लोकांना देवस्वरूप मानणारा हा भक्तीयोग सामाजिक सेवेच्या दृष्टीने किती क्रांतिकारी व प्रेरक ठरेल यावर निराळे भाष्य करण्याची जरूर नाही. गंगेचे साध्य वा मोक्ष समुद्राला मिळणे हा असला तरी ज्याप्रमाणे गंगा लोकांना पाणी देत देत व अवतीभवतीची शेते फुलवीत फुलवीत समुद्राला जाते त्याप्रमापे सज्जनानी आपल्या अवती भवतीच्या समाजाला सुखवीत सुखतीत आपला मोक्ष सिद्ध करावा. 'वारीत पृथ्वीचे आपताप। पोखीत तीरीचे पादप। समुद्रा जाय आप गंगेचे जैसे।" या दृष्टांन्तात अध्यात्मिक मानवतेचा संतसिद्धांत समर्पकपणे प्रतिपादिला आहे.

## जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती

आत्मसाधना कितीही सिद्ध झाली तरी लोकांसाठी आपले कर्तव्य आपण पार पाडलेच पाहिजे यावरही संतांचा कटाक्ष आहे. देखे प्राप्तार्थ जाहले। आणि निष्कामता पावले। तयाही कर्तव्य असे उरले। लोकालागी।। गीतेने जो

अनासक्त कर्मयोग सांगितला त्याचाच मराठी आविष्कार संताच्या जीवनदर्शनात पहावयास मिळतो. "बुडत हे जन देखवेना डोळा" अशी संतांची आर्त दुःखी जनाबद्दल तादाम्यपूर्ण संवेदना आहे. "आर्ताचेनि ओरसे" आर्तजनांच्या साठीच ज्ञानेश्वरीचा जन्म झाला. "परोपकार पुण्य पाप पर पीडा।" हीच संतांची पापपुण्याची कल्पना आहे. "नाचू किर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी" हा संतांचा संकल्प आहे. जै धर्माची वाट मोडे। अधर्माशी शीग चढे तै आम्हां येणे घडे। संसारस्थीती। हे संताचे अवतारकार्य आहे. गरजू श्रांत लोकांची उणिव भरून काढल्याशिवाय सज्जनाने पुढे जाऊ नये. खड्डा भरल्याशिवाय पाणीं पुढे जाऊ इच्छित नाही, त्याचप्रमाणे निम्न भरल्याविणे। तोय ढळोचि नेणे। तेवी श्रांता तोषोनि जाणे। सामारे पा।। हा सर्व सद्प्रवृत्त लोकाना संतांच्रा उपदेश आहे. आज आपल्या देशात दारिद्रय, अज्ञान, वैषम्य, जातिभेद असे अनेक खड्डे आहेत. ते आपल्या जीवनाने भरून काढण्याचा यत्न करणे हा संत प्रणित मानवधर्म आहे. ईश्वराच्या स्वरूपाबद्दल अनेक ज्ञानी भक्तानी अनेक कल्पना केल्या आहेत. परंतु ईश्वर सर्व ठिकाणी आहे, या त्यांच्या तत्वज्ञानाला साजेसा असा ईश्वर संतानी साकार केला आहे. तो ईश्वर म्हणजे सर्वेश्वर। सर्वामध्ये ईश्वर आहे म्हणून सर्व भक्ती वा सर्वांची सेवा म्हणजेच ईश्वरभक्ती असे संतदर्शन सांगते. "कुणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे। हीच भक्तीची खरी व्याख्या आहे. आपण आयुष्यात कोणताही उद्योगधंदा केला पण सर्वेश्वराला अनन्यभावे स्मरून तो केला तरी जीवनसाफल्य होते असा संसारी जनाना संतांनी दिलासा दिला आहे. नामा म्हणे असावे भलतिये व्यापारी। लक्ष सर्वेश्वरी ठेवोनिया।

●●●

# योगसमाधि आणि उद्योगसमाधि

संसारात राहूनही अनन्य ज्ञानभक्तीने प्रापंचिक कर्म केले तरी कैवल्याचे अधिकारी होता येते हा अध्यात्मिक प्रपंचधर्म संतानी प्रतिपादिला. प्रपंच आणि

परमार्थ यात सैद्धांतिक विरोध नाही, प्रश्न आसक्ती व अनासक्ती यांचा आहे. जो प्रपंची सावधान। तो परमार्थ करील पूर्ण। जो प्रपंची अप्रमाण। तो परमार्थी खोटा। असे संतवचन आहे. प्रपंची ते भाग्य परमार्थी वैराग्य दोन्ही यथासांग दोन्हीकडे। असा भाग्य-वैराग्याचा हा समन्वय आहे. "जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी। या तुकोबांच्या अभंगात ज्या गृहस्थाश्रमात परोपकार, शांती, भूतदया गोपालन इत्यादि गोष्टी असतात. तो गृहस्थाश्रम, योग्याच्या आश्रमापेक्षा श्रेष्ठ आहे असा निर्वाळा या अभंगात दिला आहे. "तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ। परमपद बळ वैराग्याचे । बहुतेक सर्व संत परिस्थितीने गरीब होते. तुकोबा, गोरोबा, नामदेव, चोखामेळा, सावतामाळी, नरहरी सोनार, कबीर आदि सर्व संत आपापले उद्योगधंदे करून आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करीतच होते. कोणीही घर सोडले नाही, आपला धंदा सोडला नाही. वेदान्ताचा अभ्यास करायास वा योगमुद्रा करायासही त्यांना फुरसत नव्हती. व्यावहारिक अर्थाने सर्वसामान्य लोक होते. तथापि हे सामान्य लोक असामान्य संत होऊ शकले हाच संतदर्शनाचा सर्वश्रेष्ठ महिमा आहे. ज्यांचे पोट हातावर होते त्यांच्या हातात मोक्ष देणारे हे संतदर्शन जगात अपूर्व आहे. संतानी मुखी नाम होती मोक्ष। ऐसी साक्ष बहुतांची। अशी साक्ष जगाला पटविली. महाराष्ट्राच्या संत परंपरेत सर्व जाती धर्माचे संत झाले हा तर जगात कुठेही पहावयास मिळणार नाही असा अपूर्व साक्षात्कार संतानी दाखविला आहे. अनेक महापुरुषांनी व सद्गुरूंनी मुमूक्षू साधक शिष्याला योगसमाधी दिली पण त्याहिपलीकडे जाऊन ज्ञानेश्वरादि संतांनी या साधक भक्ताना उद्योगसमाधी दिली हे अलौकिक आहे. आपापले उद्योग ईश्वरार्पण बुद्धीने दिव्य तन्मय अशा समाधी अवस्थेतही ही संतमंडळी करीत होती. 'न लगे सायास जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण। हे वचन या सर्वांनी प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविले.

## मराठिचिये नगरी

वरील विवेचनावरून भुतदयेने प्रेरित झालेले संत सर्व सामान्य लोकांच्या दुःखमुक्तीसाठी व सुखशांतीप्राप्तीसाठी आपले आयुष्य वेचित होते हे दिसून

येईल. ज्या मराठमोळ्या जनतेला ज्ञानाची संधी नव्हती. ज्ञान भांडार संस्कृतमध्ये असल्यामुळे ते केवळ उच्चवर्णीयांची वा वैदिक ब्राम्हणांची मक्तेदारी झाली होती व सामान्य माणूस या सास्कृतिक प्रक्रियेपासून वंचित झाला होता. त्यांच्या उद्‌बोधासाठी ज्ञानेश्वरादि संतांनी मराठी भाषेची कास धरली. ज्ञानामृतगंगा वहात असताना सुद्धा सामान्य लोक त्या गंगेत जाऊन आपली जिज्ञासेची तहान भागवू शकत नव्हते कारण एक तर अवती भवतीच्या संस्कृतच्या जंगलामुळे सामान्याला त्या गंगेपर्यंत पोहचता येत नव्हते व पोहोचले तरी गंगेला पाणोठा वा घाट नसल्यामुळे ते जलप्राशन करू शकत नव्हते. संस्कृतची जंगले साफ करून मराठी शब्दाचे घाट बांधून आबालवृद्ध जनतेला ज्ञानगंगेत अवगाहन करण्याची संधी संतानी दिली आणि त्यामुळे मराठीचिये नगरी। ब्रह्मविद्येचा सुकाळू करी असा साक्षात्कार महाराष्ट्रात घडला. जी भाषा लोकांना कळत नाही त्या संस्कृत भाषेत उपदेश केला तर सामान्य परिवार नागवेल की, सामान्य माणसाची कुचंबणा होईल याच जनप्रेमाने महानुभाव पंथाने मराठीला महत्व दिले. सारांश, संतांना लोकांच्या उद्धाराची किती तळमळ होती व त्यासाठी सर्व बाजूंनी त्यांनी किती प्रयत्न केले याची साक्ष पटेल.

## जीवनयोग

हे लोकोद्धोराचे प्रयत्न घरदार सोडून केवळ निवृत्तीमार्गाला लावण्याचे नव्हते तर आपापले प्रापंचिक वा सामाजिक कर्तव्य करीत असताना आपली सर्व कृति ईश्वरार्पण बुद्धीने केली तर प्रपंच व परमार्थ यांत भेद न रहाता सामान्य संसार करणारा मनुष्यही परमकैवल्याचे सार हस्तगत करू शकतो हेच संतांनी सिद्ध करून दाखविले. चरितार्थासाठी जीवन चालविण्यासाठी अनेक व्याप, उद्योग, हालचाली, प्रयत्न वा व्यापार करावेच लागतात. तथापि सर्वेश्वराला सर्वार्पण करण्याच्या अनासक्त भूमिकेतून या सर्व गोष्टी केल्या तर जीवनशांती मिळू शकते. "नामा म्हणे असावे भलतिया व्यापारी। लक्ष सर्वेश्वरी ठेवोनिया।" प्रपंचाच्या गोष्टी करीत असताना प्रापंचिक व पारमार्थिक समाधान व्हावयाचे असेल तर धर्मार्थकाममोक्ष या सर्व पुरुषार्थाचा विचार करावा लागतो. वैयक्तिक

सद्गुणसंवर्धन व सामाजिक नीतीचे परिपालन या दोन्ही गोष्टींवर भर दिल्याशिवाय मानवधर्म कृतार्थ होणार नाही, हे जाणून संतांनी बारकाव्याने अभ्यास करून समाजाला सद्गुणसंवर्धनाचे नीतिसंस्कार दिले आहेत. चारित्र्यसंवर्धन हाच समाजाचा पाया आहे. याबद्दल सर्व लोकांत एकमत आहे व शिक्षणांत व समाजांत सामाजिक वा राष्ट्रीय शीलनिर्मितीचे व शीलसंवर्धनाचे कार्य झाले पाहिजे असे विचारवंत आग्रहाने सांगत आहेत. हे महान कार्य आपापल्या काळात संतांनी केले. या सत्कार्याबद्दल कुणाचेच दुमत नसल्यामुळे त्याचा ऊहापोह करावयाचे कारण नाही. व्यक्तिजीवन, कुटुंब जीवन व समाजजीवन यांचा सुयोग्य मेळ असल्याशिवाय व्यक्ति वा समाज प्रसन्न रीतीने चालणारच नाही. सर्वंकष मानवधर्माच्या संस्काराशिवाय हे कार्य होणार नाही. याचाच अर्थ समाजातील पतिपत्नी, पितापुत्र, राजाप्रजा, शत्रुमित्र इत्यादि जे अनेक संबंध असतात त्या प्रत्येकाच्या कर्तव्याला धर्मभावनेचे रूप देऊन ते ते कर्तव्य तो तो घटक पार पाडतो आहे, अशी वस्तुस्थिती निर्माण करणे म्हणजेच हा मेळ घालणे होय. कर्तव्याला धर्मभावनेची जोड देणे व धर्माला समष्टिधर्माची जोड देणे हे समाजाच्या उत्थानाच्या दृष्टीने अवश्य आहे हे महान कार्य संतांनी आपापल्या काळांत केले आहे. संतांच्या शिकवणीचे सार आपण लक्षात घेतले तर संतबोध केवळ पारलौकिक विचारावरर वा पारंपारिक धर्मरूढी कल्पनांवर आधारित नसून आध्यात्मिक सुखशांती बरोबरच समाजाचे दुःख दूर होऊन त्यांनाही सुखशांतीचा लाभ व्हावा यासाठी संतांनी आपले जीवनपणास लावले होते असे म्हणण्यास हरकत नाही. कारण त्यांचे अध्यात्मच विश्वात्मक म्हणजे सामाजिक होते. वैयक्तिक मोक्षसाधना करून कुठे कुणा एकाद्यालाच वैकुंठप्राप्तीचा लाभ देण्याची परंपरा संतांनी बदलली व हे जगच वैकुंठासारखे सुखमय व्हावे असा संकल्प कार्यान्वित केला. कै एकादेनी वैकुंठा जावे। इही वैकुंठची केले आधवे। ऐसे नामघोष गौरवे धवळिले विश्व। ऐसे माझेनि नामघोषे नाहीशी करीत जगाची दुःखे, की सकल जगची महासुखे दुमदुमित भरले। आपल्या ज्ञानभक्तीपूर्ण नामघोषाने जगाचे दुःख कमी करण्याचा हा संताचा संकल्प म्हणजे सामाजिक हिताची प्रेरणाच होय. तुका म्हणे त्यांनी। केली वैकुंठ मेदिनी। श्रीज्ञानेश्वराचे पसायदान, संतांच्या आत्मकल्याणकारी व विश्वकल्याणकारी

दिव्य शुद्ध संकल्पाची ग्वाही देत आहे. दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । जो जे वांछील तो ते लाहो प्राणीजात। किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होऊनि तिन्ही लोकी। भजिजो आदि पुरुखी अखंडीत।

## भूतांची दया हे भांडवल संता.

मनुष्य हा समुदाय करून रहाणारा समाजिक प्राणी आहे. समाजाकडे दुर्लक्ष करून त्याचे हित साधणार नाही. व समाजही चालणार नाही. समाजसुखी असावा असे सद्प्रवृत्त लोकांना वाटत असले तरी केवळ सदिच्छेने वा प्रार्थनेने कार्यभाग होत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष भूतदया आचरणांत आणली पाहिजे याची प्रचीती संतांनी आपल्या कार्यातून दिली. समर्थांनी तर समुदायाच्या म्हणजे समाजाच्या सुखदुःखांत भागीदार बनून दुःखही वाटून घेतले पाहिजे असे सांगितले.

"दुसऱ्याच्या दुःखे दुःखावे। दुसऱ्यांच्या सुखे सुखावे। अवघेचि सुखी असावे ऐसी वासना। दुःख दुसऱ्यांचे जाणावे। जाणोनी तरी वाटोनी घ्यावे, बरेवाईट सोसावे समुदायाचे।" हा उपदेश म्हणजे समाजसेवेच्या तत्वज्ञानाचे महासूत्रच आहे, असे म्हणता येईल. समाजवादाच्या सामाजिक अनुभूतीचे बीज समर्थांच्या या समुदायनिष्ठेच्या ओवीत सूत्ररूपाने दिसून येते. अध्यात्मनिष्ठेला समाजनिष्ठेची जोड दिल्याशिवाय अध्यात्म हे यथार्थतेने अध्यात्मज्ञान होऊ शकत नाही आणि समाजशास्त्र वा सामाजिक नीतिशास्त्र यांना अध्यात्माचे अधिष्ठान असल्याशिवाय सफलता येणार नाही, हे संत विचाराचे रहस्य आहे. आपल्यासारखाच आत्मा सर्व भूतमात्रात आहे या आत्मौपम्य संकल्पनेची प्रचीती आल्याशिवाय समाजशास्त्र वा समाजसेवा कृतार्थ होणार नाहीच. हा सिद्धांत लो. टिळकांनी गीतारहस्यांत समर्पकपणे प्रतिपादिला आहे. सर्व भूतमात्राच्या ठायी ईश्वर पहाणाऱ्या सर्वेश्वराचा साक्षात्कार झालेले ज्ञान, सर्वभूतमात्राबद्दलच्या अथांग दयेवर आधारलेली भक्ती आणि सर्व लोकांच्या उध्दारासाठी सातत्याने जीवनभर चाललेले सत्कर्म अशा या ज्ञानभक्तीकर्मांच्या त्रिवेणी संगमातून संतांच्या अध्यात्मिक मानवताधर्मांचा मंगल प्रवाह लाखो जीवाना पावन करीत शेकडो वर्षे चालत आला आहे. अनेक साधकाना आत्मसाधनेचे वा अध्यात्माचे आकर्षण

आहे. परंतु सर्वात्मक चैतन्याचे त्याना भान नसल्यामुळे त्यांची साधना केवळ स्वहिताची होत आहे. त्याचप्रमाणे अनेक सेवकांना मानवकल्याणाचे वा मानवतावादाचे आकर्षण आहे परंतु सर्वाठायी असलेल्या आत्मतत्वाबद्दल ते संशयवादी असल्याने समाजासाठी स्थिर अशी आत्मसमर्पणाची वृत्ती निर्माण होऊ शकत नाही, समाजातही आत्मसंवेदनाच्या व सहानुभूतीच्या भावना ते प्रभावी करू शकत नाहीत. म्हणून आत्मसाधना आणि समाजसेवा यांचा यथायोग्य समन्वय झाल्याशिवाय जुन्या भाषेत धर्मसंस्थापना वा नवीन भाषेत नवसमाजरचना होणार नाही. धर्मकारण शांतीच्या नादात मानवधर्माविषयी उदासीन राहीले तर घरांत कदाचित धर्माचार चालेल पण समाजात अधर्म व अनीती वाढेल. त्याचप्रमाणे राजकारण वा समाजकारण केवळ भौतिक विकासाच्या नादात अध्यात्मिक नैतिक मुल्याबद्दल बेफिकीर राहिल तर भौतिक विकास विनाशाच्या दिशेने नेऊ शकेल या दोन्ही गोष्टी आज स्पष्टपणे दिसत आहेत. म्हणून भौतिक प्रगतीसाठी विज्ञान आणि नैतिक प्रगतीसाठी आत्मज्ञान या दोहोंच्या समन्वयाची नितांत आवश्यकता आहे, असे विचारी ज्ञानविज्ञान महर्षी तळमळीने सांगत आहेत. भौतिक विकासाचे लाभ प्रत्येकाला मिळावे, या भौतिक विकास प्रेरणांसाठीसुद्धा मानसिक संवेदनशीलतेची व सहानुभूतीची जरूरी आहे. ही व्यापक सहानुभूतीही भौतिक प्रेरणातून सिद्ध होणार नाही, त्यासाठी भूतदया, भूतहित आणि सर्वात्मभाव यांचा अवलंब केल्याखेरीज गत्यंतर नाही, म्हणून ज्यांना ज्यांना सर्वांचा विचार करावयाचा आहे तो विचार भौतिक विकासाचा वा भौतिक स्वार्थाचा जरी असला तरी सर्वांचा स्वार्थ सिद्ध व्हावा या संकल्पनेलाही परमार्थप्रेरणेची आवश्यकता आहे. या प्रेरणा संतदर्शनाने समाजास दिल्या आहेत. तो वारसा घेऊन व तो कार्यान्वित करताना कालोचित बदल करून संतविचाराचे पुनरूज्जीवन समाजहितैषी लोक करू शकतील तर आधुनिक समाजाला ते वरदानच ठरेल.

## विश्व स्वधर्म सूर्ये पाहो.

आजच्या परिस्थितीत भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने राष्ट्रीय एकात्मता हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. सामाजिक समता, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकात्मता

व राष्ट्रीय शीलसंवर्धन हे विषय केवळ धार्मिक वा सांस्कृतिक राहिलेले नसून भारतीय समाजाच्या शांतिस्थैर्याचे वा राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या रक्षणसंवर्धनाचे ज्वलंत प्रश्न बनले आहेत. संतांच्या जीवनदर्शनाचा मागोवा घेऊन या मूल्यांच्या संवर्धनसिद्धीसाठी काय करता येईल यासाठी संतपीठाची संकल्पना पुढे आली आहे. या विषयाचा विचार स्वतंत्र प्रकरणात पुढे आम्ही करणार आहोत. सर्वत्र एकात्मभावनेची दृष्टी घेतली तर हे सर्व प्रश्न सुटणे सुकर जाईल, म्हणूनच या प्रकरणांत संताच्या आध्यात्मिक मानवधर्माची पार्श्वभूमि आधी दिली आहे. जातिपेक्षा भक्तीला महत्व, उपचारापेक्षा सदाचाराला महत्व, जातिधर्मापेक्षा नीतीधर्माचे महत्व, समतेचा पुरस्कार एकात्मतेचा आविष्कार आदि गोष्टी संतांच्या जीवनदर्शनातून प्रतीत होतील. त्या त्या विषयाच्या अनुषंगाने ते विशद करता येईल. आत्महिताचे व समाजहिताचे संस्कार या जीवनदर्शनातून सर्वांना लाभू शकतील या जाणिवेतूने संतपीठाची संकल्पना पुढे आली आहे. देशकाल परिस्थितीच्या मर्यादा लक्षांत घेऊनही संतदर्शन हे सर्व मानवांच्या कल्याणासाठी प्रवर्तित झाले व आजही त्यासाठी ते प्रेरक ठरेल, याबद्दल दुमत होणार नाही.

भारतांत- अध्यात्मिक मानवधर्माची ही परंपरा व्यास, वाल्मिकी पासून तो विवेकानंद, गांधी पर्यंत अनेक विभूतींच्या जीवनदर्शनापासून प्रतीत होत आली आहे. भगवान बुद्ध, महावीर, ख्रिस्त, महमद पैगंबर, नानक या महाविभूतींनी याच अध्यात्मिक मानवधर्माचे प्रवर्तन केले आहे. महाराष्ट्रात ज्ञानोबा पासून विनोबापर्यंत अनेक संतमहात्म्यांनी अधिक व्यापक, अधिक सेवाभावी व अधिक पुरोगामी अशी मानवधर्मदीक्षा दिली आहे. या मालिकेत महात्मा ज्योतिबा फुले, गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, साने गुरूजी प्रभृतींचा गौरवाने उल्लेख करावा लागेल. लो. टिळक, डॉ. आंबेडकर प्रभृति नेत्यांच्या क्रांतिशील कार्याची भूमिका मानवधर्मनिष्ठेचीच राहिली आहे. या सर्व परंपरेचा मागोवा घेऊन या पुरोगामी अध्यात्मिक मानवतावादाचे संस्कार प्रभावी करणाच्या कामी संतपीठाचा उपयोग होईल.

●●●

# प्रकरण तिसरे

## शिक्षण आणि जीवनमूल्ये

सन्तपीठ हे मुख्यतः शिक्षण व संस्कार यांचा समन्वय करणारे सांस्कृतिक विद्यापीठच व्हावे याच उद्देशाने सन्तपीठाची संकल्पना पुढे आली आहे. म्हणून या प्रकरणात एकूण विद्यापीठाच्या उद्दिष्ट ध्येयाबाबत राधाकृष्णन आयोगाने जे मौलिक विचार मांडले आहेत ते साररूपाने आम्ही सादर करीत आहोत. ती उद्दिष्टे विद्यापीठाकडून साध्य व्हावीत म्हणून आयोगाने काही मौलिक सुचनाही केल्या होत्या. विद्यापीठाच्या महत्वपूर्ण अशा शीलसंवर्धन, समाजनिष्ठा, एकात्मता, समता, समाजसेवा या उद्दिष्ट पूर्तीच्या बाबतीत प्रचलीत शिक्षण पद्धती अपेक्षेइतकी यशस्वी झाली नाही, हे सर्वमान्य आहे. त्यासाठी शैक्षणिक परिवर्तन व्हावे असाही विचार बळावतो आहे. ही पार्श्वभूमी सन्तपीठाच्या संकल्पनेला पोषक आहे. शिक्षणक्षेत्राचा मौलिक विचार करणाऱ्या विचारवंतांनी मानव्याच्या आणि एकंदर विश्वकल्याणाच्या दृष्टीने विद्यापीठाच्या उद्दीष्ट ध्येयाची जी सूत्रे आपल्या आयोगाच्या अहवालात ग्रंथीत केली आहेत ती सूत्रे आधारभूत मानून जरी आजच्या शिक्षण तज्ञांनी विचार केला तरी अध्यात्मिक मानवतावादाचे संस्कार शिक्षणक्रमांत अंतर्भूत करणे समाजाच्या व देशाच्या हिताच्या दृष्टीने किती आवश्यक आहेत हे जाणत्या लोकांना पटल्याशिवाय राहणार नाही. राधाकृष्णन आयोगाचा सारभूत भाग आम्ही येथे सादर करीत आहोत. म्हणजे शिक्षणात सन्ताच्या अध्यात्मिक मानवतावादी शिकवणुकीच्या आवश्यकतेवर व महत्वावर

निराळे भाष्य करावयाची जरूरी नाही. भारताला स्वराज्य मिळाले आणि स्वतंत्र भारताला विद्यापीठे कशी असावीत याबाबत शिफारशी करण्याकरता भारताचे थोर तत्वज्ञानी डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली १९४८ साली या आयोगाची नियुक्ती झाली. या आयोगाने विद्यापीठाबाबत साकल्याने विचार केला. सन्तपीठाच्या दृष्टीने त्या अहवालातील दोन प्रकरणे अत्यंत महत्वाची आहेत. विद्यापीठाच्या उद्दिष्टाचे एक प्रकरण व धर्मशिक्षणाबाबतचे दुसरे प्रकरण आहे. Aims of university education या प्रकरणात स्वातंत्र्योत्तर नवभारताच्या विद्यापीठाकडून आयोगाची अपेक्षा अशी आहे की, "India is rich in natural resources and her people have intelligence and energy and are throbbing with renewed life and vigour. It is for the universities to create knowledge and train minds who should bring together the two, material resources and human energies. If our living standards are to be raised, a radical change of spirit is essential."

भारतीय संस्कृतीने धर्मार्थकाममोक्ष असे चार पुरुषार्थ मानले आहेत. या पुरुषार्थाचा सुयोग्य समन्वय म्हणजेच मानव-संस्कृती. अर्थकामाचा विचार म्हणजे केवळ स्वार्थाचा विचार आणि धर्ममोक्षाचा विचार म्हणजे केवळ परमार्थाचा विचार असे समीकरण दुर्देवाने शेकडो वर्षे चालत आहे. त्यात बदल व्हावयाचा असेल तर शिक्षणात भौतिक विद्येच्या पुरस्काराबरोबरच नैतिक संस्कार समाविष्ट होणे अगत्याचे आहे.

"The purpose of all education, it is admitted by thinkers of East and West, is to provide a coherent picture of the universe and an integrated way of life. We cannot be wise without some basis of knowledge and remain devoid of wisdom. Since education is both a training of minds and a training of souls, it should give both knowledge and wisdom"

Human beings are not at all built in the same way. They are of different types, reflective, emotional or active, though they are not exclusively so. They are distinguished on account of the dominance or emphasis of the one or the other. Cognition, feeling and will though logically distinguishable are not really separable in the concrete life of mind. These three sides, which answer to the familiar distinction of Jnan, Bhakti and Karma express themselves through theoretical contemplation, aesthetic enjoyment and practical activity. The true educator should understand the psychological make up, the 'Swabhav' of the pupil and adapt his teaching to the mind of the pupil."

ज्ञानभक्तीकर्म यांच्या त्रिवेणी संगमावरच सन्त-दर्शन सर्वांना पावन करीत आले आहे. विचार भावना आणि आचार (Cognition, feeling and action) हे तिन्ही अंगभूत असतात. सर्वश्रेष्ठ विचार म्हणजे ज्ञान, सर्वश्रेष्ठ भावना म्हणजे भक्ती आणि सर्वश्रेष्ठ आचार म्हणजे कर्म. या तिन्ही गोष्टीचा सुयोग्य समन्वय म्हणजे जीवनविकास. जीवनविकासासाठी शिक्षण असल्याने या तिन्ही गोष्टींना शिक्षणात उचित स्थान मिळणे जरुर आहे. विद्यापीठ अभ्यासक्रमात सायन्स आणि ह्यूमॅनिटी विज्ञान आणि मानवज्ञान असे वर्गीकरण करण्यात येते. जीवनामध्ये विज्ञानाबरोबरच मानसिक व सामाजिक प्रक्रियांची आवश्यकता असते. खास अभ्यासाचे क्षेत्र म्हणून काही विषय निवडावे लागतात. पण याचा अर्थ असा नव्हे की समाजशास्त्राच्या विद्यार्थ्याला आवश्यक ते विज्ञानही माहीत असू नये. वा विज्ञानाच्या विद्यार्थ्याला आवश्यक त्या मानवी गुणधर्मांची माहीती असू नये. जीवनामध्ये नैसर्गिक, सामाजिक व अध्यात्मिक असे तीन भाग पडतात. तिन्हीचा परस्परसंबंध जाणून घेऊन आपले व समाजाचे जीवन सुखशांतीपूर्ण बनविणे ही खऱ्या ज्ञानाची कसोटी आहे.

"The purpose of humanitites is to enable man to understand his inner aspiration and ideals If education is to guide the individual towards comprehension of the art of life, it must energise his whole being and give him ideas of nature, society and values."

निसर्गाचा बोध विज्ञान देते, समाजाचा बोध ज्ञान देते आणि जीवनमूल्याचा बोध आत्मज्ञान देते.

If human life is to remain human it must deepen and live by a sense of moral obligation.

We are building a civilisation not a factory or a workshop. The quality of civilisation depends not on the material equipment or the political machinery but on the character of men. The major task of education is the improvement of character. What holds a society together and gives the individual balance and respect, is the possession of culture. Culture is intellectual alertness, receptiveness to Beauty, human feeling, social enthusiasm. If society is not to disintegrate into an aggregate of individual specialists, we should endow the youth with a central core of values, transmit to them a cultural heritage.

One of the serious complaints against system of education which has prevailed in this country for over a century is that it neglected India's past, that it did not provide the Indian students with a knowledge of their own culture. It has produced in some cases the feeling

that we are without roots, what is worse, that our roots bind us to a world very different from that which surrounds us.

Nations are not made by traders and politicians. They are made by artisist and thinkers, saints and philosophers. It is the life of spirit that has shaped and unified our collective existence and has been the real bond of oneness among the Indian people. After centuries of stress and conflicts India has gradually evolved a common civlisation, a collective consciosness which embraces wide varieties of temperament, tradition, ways of thoughts and belief. Our people belong to different provinces, speak their own languages, preserve their own babits and customs. There are sharp differences of temper, traditions and dialect; despite all these there is a fundamental unity which binds the people together as members of one society with the same cultural loyalities." आम्ही राधाकृष्णन आयोगाच्या अहवालातील काही महत्वपूर्ण उतारे वर उद्धृत केले आहेत. निसर्गसंपत्ती आणि मानवसंस्कृती यांचा समन्वय साधणारे ज्ञान देणे हे विद्यापीठाचे कार्य आहे. आपणा सर्वांचे जीवन उंचावयाचे असेल तर आपल्या अंतरात्म्यात प्रभावी बदल झाला पाहिजे. भौतिक प्रगतीला नैतिक आधार असला पाहिजे. प्रत्येकाच्या व्यक्तीत्वात बुद्धी, भावना व कृती अंगभूत असतात त्या सर्वांचा संतुलीत विकास केला पाहिजे, त्यासाठी ज्ञानभक्तीकर्माच्या साधनेचा मागोवा घेतला पाहिजे. विज्ञान व मानवज्ञान हे एकमेकाला पूरक असले पाहिजेत, आपण केवळ एखादा कारखाना व दुकान उभे करीत नसून नवसमाजनिर्मिती करीत आहोत ही जाणीव ज्ञानदानात असली

पाहिजे, संस्कृतीचा आधारभूत असणाऱ्या चारित्र्याचा भक्कम पाया चालण्यासाठी ज्ञानसंस्कार प्रभावी केले पाहिजेत.

भारतीय संस्कृतीचा अध्यात्मिक, नैतिक व मानवतावादी वारसा न विसरता त्यांच्या प्रेरणा परंपराही भारतीय शिक्षण पद्धतीत उजळल्या पाहिजेत, मानवी जीवन मानवी म्हणून जगावयाचे असेल तर नैतिक कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे, समाज विघटित व्हावयाचा नसेल तर तरुणांना जीवनमूल्यांची व त्यांच्या सांस्कृतिक वारशाची दीक्षा दिली पाहिजे, भारतातील शिक्षणसंस्थांतून वा विद्यापीठातून भारतीयतेचा काही प्रत्यय आला पाहिजे, धर्म, भाषा, प्रांत असे नाना प्रकारचे भेद असताना त्या भेदावर मात करून भारताची एकता सिद्ध करणाऱ्या गौरवशाली इतिहासाचा मागोवा घेण्यांत आला पाहिजे आणि एकंदरीने सर्वांगीण विकासास साहाय्यभूत होणाऱ्या प्राकृतिक आणि सांस्कृतिक अशा ज्ञानविज्ञानाचे बोधपाठ शिक्षणातून प्रतीत झाले पाहिजेत. हा आयोगाचा आशय आम्ही वानगीदाखल दिलेल्या उताऱ्यावरुन स्पष्ट होऊ शकेल.

## कोठारी आयोगाच्या शिफारशी—

१९६४ साली सरकारने भारतीय शिक्षण महामंडळाची नियुक्ती केली. शिक्षणाची राष्ट्रीय पद्धती व सर्वस्तरावरील शिक्षणाच्या सांगोपांग विकासाकरिता आवश्यक असलेली सर्वसाधारण ध्येय-धोरणे याविषयी भारत सरकारला सल्ला देणे असे या कोठारी आयोगाचे कार्य होते. या आयोगाने त्या दृष्टीने बऱ्याच शिफारशी केल्या व त्यानंतर आजपर्यंत चालू असलेल्या शिक्षणपद्धतीला आधारभूत असलेल्या मार्गदर्शनाचा आधार हा कोठारी आयोग आहे असे म्हणण्यास हरकत नाही. या कोठारी आयोगाने अध्यात्मिक, नैतिक व धार्मिक शिक्षणाबाबत काही विचार प्रदर्शित केले आहेत व काही शिफारशीही केल्या आहेत त्या अहवालातील काही उतारे आम्ही उद्‌धृत करीत आहोत. त्यावरून शिक्षणक्रमात अध्यात्मिक व नीतिधर्मशिक्षणाची आवश्यकता आहे, इतकेच नव्हे तर हे शिक्षणही सर्वसाधारण शैक्षणिक अभ्यासक्रमाचे अविभाज्य अंग असले पाहिजे असा कोठारी आयोगाचा अभिप्राय असून त्या दृष्टीने त्यांनी काही महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत असे पुढील उताऱ्यावरून स्पष्टपणे दिसून येईल.

Modernization does not mean a refusal to recognize the importance of or to inculcate necessary moral and spirutual values and self descipline. Modernization to be a living force, must derive its sterngth from the spirit.... The expanding knowledge and the growing power which modernization places at the disposal of society must, therefore, be combined with the strengthening and deepening of the sense of social responsibility and a keener appreciation of moral and spiritual values :-

We make the following recommendations :-

1) The Central and State Government should adopt measures to introduce education in moral, social and spiritual values in all institutions under their direct control on the lines recommended by the University Education Commission.

2) The privately managed institutions should also be expected to follow suit.

3) Apart from the education in such values being made an integral part of the School programmes some periods should be set apart in the time table for this purpose. They should be taken not by specially recruited teachers but by general teachers preferably from different communitites considered suitable for this purpose. It should be one of the important objectives of training institutions to prepare teachers for it.

4) We also suggest that University departments in comparative religion should be specially concerned with the ways in which these values can be taught and

should undertake preparation of special literature for students, in attempt to inculcate values through education. We should draw freely upon our tradition as well as traditions of other countries and cultures. There are strands within Indian thought itself which contact to the new outlook appropriate for a modern society.. Mahatma Gandhi (and some others) for instance. discovered them for their idealism and their passionate striving for social justice and social reinterpretations and re-evalution of the past that are now most needed....

In such a society, however, care has to be taken to make a distinction between religious education and education about religion.

It is however, necessary for the multireligiuos democratic. state to promote tolerant study of all religions so that its citizens can understand each other better and live amicably together. "We suggest that a syllabus giving well chosen information about each of the major religions should be included as part of the course in citizenship or as a part of gener education. It should highlight the fundamental similiarities in the great religions of the world and the emphasis they place on the cultivation of character and moral and spiritual values.

"In the life of the majority of Indians religion is a great motivating force and is intimately bound up in the formation of character and the inculcation of ethical values. We, recommend, thereforce that conscious and organised attempts be made for imparting education in social, moral and spiritual

values with the help, wherever possible of the ethical teachings, of great religions" कोठारी आयोगाच्या शिफारशीबाबत जे उतारे आम्ही दिले आहेत त्यावरून अध्यात्मिक, नैतिक व धार्मिक शिक्षणाबाबत शिक्षण तज्ज्ञांच्या महामंडळालाही किती महत्व वाटते हे दिसून येईल.

सध्या देशात शैक्षणिक पुनर्रचनेने विचार चालू आहेत. त्या विचाराला चालना मिळावी म्हणून भारत सरकारच्या शिक्षण खात्याने 'Challenge of Education a policy perspective' हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. An approach to educational reconstruction या प्रकरणात शिक्षणाच्या उद्दिष्ट कार्याबाबत हे पुस्तक म्हणते."

"Secondly, emphasis has to be laid on the socio-economic competence and creativity of the individual, which encampasses

(i) Physical, intellectual, aesthetic development of presonality.

(ii) inculcation of a scientific temper and democratic moral and spiritual values.

(iii) Development of self confidence ..

(iv) a commitment to principles of socialism and social justice.

या उद्दिष्टावरून शैक्षणिक पुनर्रचनेतही अध्यात्मिक, नैतिक शिक्षण, सर्वधर्म समभाव, राष्ट्रप्रेम इत्यादि जीवनमूल्यावर आधारलेल्या ध्येयवादी शिक्षणाचा अंतर्भाव करण्यावर भर देण्यात आला आहे हे स्पष्ट दिसते.

स्वराज्यानंतर भारताचा राज्यघटना तयार झाली व त्यांत धार्मिक शिक्षणाबद्दलची काही तत्वे ग्रथित करण्यात आली.

All presons are equally entitled to freedom of conscience and the right freely to profess practise and propagate religion. 22 (I) No religious instructions shall

be provided in any educational institution wholly maintained out of state funds,

Provided that nothing in this clause shall apply to an educational institution which is administered but has been established under an endowment or trust which requires that religious instructions shall be imparted in such institutions. (2) No person attending any educational institution recognised by the State or receiving aid out of the state funds shall be required to take part in any religious institution or to attend any religious worship that may be conducted in such institution or in any premises attached thereto unless such person, or if such person is a minor, his guardian has given his consent threto,

State Educational Institutions cannot hope to provide religious instructions in all these faiths. In the words of Dr. Ambedkar "to assign such a task to the state would be to ask it to do the impossible" "we should be considerably disturbing the peaceful atmosphere of an institution of these controversies with regard to the truthful characters of any particular religion and erroneous character of the other were brought Juxtaposition in the school itself." In the course of discussion of Article 22th question was raised whether in institution wholly maintained out of state funds like the Government Sanskrit College, Calcutta, where upanisads and Gita are studied. their study would be permitted and Dr. Ambedkar replied" My own view in this, that religious instruction is to be distinguished from research and study, These are

quite different things. A dogma is quite different from study." In other words even in institutions maintained by Government, Religon can be studied critically, as part of a course in general culture There is a difference between the preaching of dogma and a philosophical study of religion. While, the former is precluded the latter is premitted. There shall be no sectarian indoctrination in state institutions. But history of religion and religious institutions, comparative religion, philosophy of religion can all be studied even in instructions maintained wholly out of statefund. We cannot forget that a deeply religious strain has run through our history like a golden thread.

A Healthy scepticism is the only remedy for these disturbing phenomena. In the universities and colleges we must develop the habit of free critical inquiry and apply the method of objective criticism not only to the beliefs and attitude of the people who differ from us but also to our own beliefs and attiutudes. Respect for other religions is a sign of true humility of spirit. There are many doors to the temple and which one we enterin is not so improtant so long it is a temple and not a lumber room..... Through all the vicissitudes of Indian history she tried to give expression to sense of universality in religions as well as racial matters.

There are many who feel that morality can take the place of religion. We have to understand that the great virtues of loyality, courage, discipline and self sacrifice may be utilised for good or bad ends. These are essential for a successufl citizen as well as for a

successful villain. What makes a man truely virtuous is the purpose for which he lives, his general outlook on life. Virtue and vice are determind by the direction in which we move by the way in which we organise our lives. Unless morality is taken in a larger sense it is not enough if we exclude spiritual training in our Institution. We would be untrue to our own historical development. India has believed that when one has done his duties as a Grihastha, a house holder, has been a good father or mother, a good citizen, there is still the beauty and mystery of the universe, the meaning of Life and death that sad feeling of the wish fulminded that beyond the world of positive knowledge there is a realism of foces unseen which we can feed but never know completely.

Mahatma Gandhi said "we have left out the teaching of religions from the Wardha Scheme of education because we are afraid that religions as they are practised lead to confticts rather than unity. But on the other hand I hold that the truths that are common to all religions can and should be taught to all children. Fundamental principles of ethics are common to all religions. They should certainly be taught."

The need for religion in secular state The fundamental principles of our constitution call for spiritual training. If this is the basis of our secular state, to be secular is not to be religiously illiterate, It is to be deeply spiritual and not narrowly religious.

हे विचार पारंपारिक नीतिधर्मपंडितांचे नसून आधुनिक काळातही सर्वत्र मान्यता पावलेल्या ज्ञानी शिक्षणतज्ञांचे आहेत, हे सर्वांनी लक्षात घ्यावयास हवे. या त्यांच्या मौलिक सूचना गेल्या तीसचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ काळातही शिक्षणक्रमांत कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

महाकवी रविंद्रनाथ टागोर यांनी माझी विद्यापीठाची कल्पना या निबंधात मार्मिक सूत्र सांगितले आहे. सुसंस्कृत मित्रजन वा बंधुजन निर्माण करणे हा उच्च शिक्षणाचा हेतू आहे. हेतु हा जरी असला तरी तो बाजूला जाऊन परिणाम मात्र चाकरमाने निर्माण करण्यात आला आहे. बुद्धीने साक्षर वा सुशिक्षित झालेले लोक त्यांचे मनविपरीत झाले तर भयंकर होऊ शकतात, हे समाज पाहतो आहे. परंतु जीवनमूल्याचे शिक्षण व संस्कार विद्यार्थ्यांवर व्हावे असा कुठलाही प्रभावी अभ्यासक्रम आढळत नाही. शिक्षण म्हणजे केवळ वाचण्याचे ज्ञान नसून वागण्याचेही ज्ञान आहे, या मौलिक विचाराचा प्रत्यय शिक्षणात येत नाही याची खंत विचारी लोकांना वाटते आहे. पंतप्रधान राजीव गांधी यांनी शैक्षणिक परिवर्तनाचा संकल्प केला आहे व मानवी शक्तीस्त्रोत आणि विकास हे खास खातेही निर्माण केले आहे. मानवाला तज्ञ बनवा, सूज्ञ बनवा, नेता बनवा, कुशल बनवा, काहीही बनवा पण माणसाचा आधी चांगला माणूस बनवा अशी आर्त हाक ज्ञानविज्ञान यूगातला सचिंत माणूस शिक्षण क्षेत्राल देत आहे. त्यासाठी ज्ञानविज्ञान शक्तीबरोबरच मनःशक्तीचा व आत्मशक्तीचा विकास करावा लागेल. आपल्या जीवनाचा पाया ज्या तरूण विंद्यार्थीदशेत घातला जातो आहे त्या दशेला ही दिशा लावली पाहिजे, असे सर्व विचारी लोकांना वाटू लागले आहे. आध्यात्मिक, नैतिक आणि सांस्कृतिक समाज प्रबोधन ही काळाची गरज आहे.

त्या दृष्टीने शिक्षणक्रमात परिवर्तन कसे करता येईल याबद्दल देशात विचार चालू आहेत त्या परिवर्तनाच्या साधक बाधक चर्चेत आम्ही जाऊ इच्छित नाही. तथापि जीवनतत्वज्ञानाच्या आधारावर नैतिक मानवतावादाचे संस्कार विकासक्षम अशा तरूण विद्यार्थीदशेत बिंववले पाहिजेत हे शिक्षणतज्ञांनी व समाजहितेच्छू विचारवंतांनी प्रतिपादिले आहे. थोर तत्वज्ञानी, राष्ट्रीय विभूती, थोर विचारवंत, साहित्यिक, कलाकार, सुधारक, समाजसेवक, मानवधर्मप्रणेते, सन्तमुनी यांच्या जीवनदर्शनातूनच हे संस्कार मिळू शकतील याबद्दलही दुमत नाही. हे आवश्यक कार्य आजच्या विद्यालयातून वा विद्यापीठातून केव्हा होईल सांगता येत नाही. मर्यादित कक्षेत का होईना पण हे पूरक कार्य सन्तपीठाला करता येण्यासारखे आहे. अनेक सुबुद्ध शिक्षणप्रेमी लोक आधुनिक शिक्षणात सन्तदर्शनाची काय जरुर अशीही शंका व्यक्त करतात. म्हणूनच प्रथितयश शिक्षणतज्ञ आधुनिक

समाजाचे आस्थेवाईक चिंतन करणारे डॉ. राधाकृष्णन व त्यांचे सहकारी शिक्षणशास्त्रज्ञ यानीच आधुनिक शिक्षणात, शीलवर्धन सामाजिक कर्तव्य, जीवनमूल्यांचे संस्कार, सांस्कृतिक वारशाची जाणीव, स्वातंत्र्य समता, बंधुता एकात्मता याचे प्रबोधन, ज्ञान भक्तिकर्माच्या समन्वयाचे प्रत्यंतर आणि एकंदरीने भौतिक शिक्षणाला नैतिक अधिष्ठान देण्याची आवश्यकता इत्यादिकांचा समावेश करण्याबद्दल मौलिक सूचना केल्या आहेत. या सर्व संकल्पनांचे वा गोष्टींचे प्रत्यक्ष प्रभावी दर्शन सन्तसाहित्यात अनुभवास येते. केवळ भौतिक प्रगतीच्या नादी लागल्यामुळे माणसाने बरेच काही कमावले आहे. पण तो माणुसकीला पारखा होत आहे. भौतिक विकास माणसाला विलासाची हुलकावणी देऊन विनाशाकडे नेत आहे हे बुद्धीवादी विज्ञाननिष्ठ लोकानाही.पटते आहे. म्हणून सामाजिक नीतीवर आधारलेल्या मानवधर्माच्या शिक्षणाची आवश्यकता शिक्षण तज्ञ व आधुनिक समाजसेवक प्रतिपादित आहेत. सन्तबोध हे पूरक कार्य करू शकेल. युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशनच्या अहवालात धर्मशिक्षणाबद्दल मौलिक विचार मांडण्यात आले आहेत. सन्तांचा धर्माशी अविभाज्य संबंध आहे, इतकेच नव्हे तर मानवधर्माचा चालता बोलता धर्मकोश म्हणजेच सन्त होय. सन्तभक्तांनी धर्मनिष्ठेने सन्त विचाराकडे पाहणे निराळे आणि शिक्षणशास्त्रज्ञांनी विचारवंतांनी धर्माकडे व सन्तविचाराकडे पाहणे वेगळे. सन्तपीठात सर्वधर्मविचार अनस्युत असल्याने धर्मशिक्षणाबाबतच्या आयोगाच्या सूचना कक्षात घेणे हितावह ठरेल.

●●●

# प्रकरण चवथे

## संतपीठाचे उद्दिष्ट व स्वरूप

दुसऱ्या प्रकरणात संतांच्या लोकोद्धारकार्याचे सार देण्यात आले आहे आणि तिसऱ्या प्रकरणात शिक्षणक्षेत्रातून अध्यात्मिक व नैतिक अशा मानवधर्मशिक्षणसंस्काराबाबतच्या शिक्षणतज्ज्ञांच्या शिफारशीचा गोषवारा आम्ही दिला आहे. या दोन्ही प्रकरणांचा विचार केला तर महाराष्ट्र संतांच्या जीवनदर्शनाचा तत्वबोध आणि आधुनिक विचारवन्त शिक्षणतज्ज्ञानी पुरस्कृत केलेला ज्ञानबोध यांचा सुयोग्य मेळ' होऊ शकेल हे विचारी लोकांना पटल्याशिवाय रहाणार नाही. असा मेळ घालण्याचा एक महान उपक्रम म्हणजे संतपीठाची संकल्पना होय. मानवधर्म वा सामाजिक मूल्यसंस्कारशिक्षणाच्या शिक्षण कमिशनच्या शिफारशी एकंदर शिक्षण पद्धतीत कार्यान्वित झाल्या तर ते सर्वदृष्टीनी श्रेयस्कर ठरेल. या मूल्यशिक्षणसंस्काराचे महत्व लक्षांत घेता त्यासाठी मूल्यसंस्कारशिक्षणाचे काही स्वतंत्र शैक्षणिक उपक्रम कार्यान्वित करण्यात आले तर ते रूढ शिक्षणाच्या जोडीला एक पूरक सांस्कृतिक कार्य होऊ शकेल व शैक्षणिक पुनर्घटनेतील या मानवधर्ममूल्यशिक्षणाची ती पूर्वतयारी ठरु शकेल. या दोन्हीदृष्टीने संतपीठ महत्वाचे पाऊल ठरेल. महाराष्ट्र शासनाने संतपीठ प्रस्थापित करण्याचा संकल्प घोषित करून हे वैशिष्ट्यपूर्ण महत्वाचे पाऊल उचलण्याचा पहिला मान पटकावला आहे, याबद्दल आम्हास धन्यता वाटते. आधुनिक काळाला ज्या मानवता मूल्यांची गरज आहे त्या मूल्यांचे बीजारोपण संतसाहित्यात आहे व आजही त्या मूल्यांच्या सिद्धीसाठी संतविचार प्रेरणादायी ठरतील याच उद्देशाने शासनाने संतपीठप्रस्थापना करावयाचे ठरविले आहे, ही

समाधानाची बाब आहे. संतपीठाच्या स्थापनेबाबतचा संकल्प महाराष्ट्र शासनाने २३ मार्च १९८१ च्या प्रस्तावाने जाहीर केला. "एकनाथांची सामाजिक समता, शिवाजी महाराज व महात्मा गांधी यांचा सर्वधर्मसमभाव यावर आधारित संतपीठाची स्थापना करण्याबाबत ही समिती शासनास शिफारस करील. तसेंच जगातील धर्म आणि तत्वज्ञान, जगातील संतांचे जीवन व कार्य आणि भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील संतांचे तत्वज्ञान यांचा तौलनिक अभ्यास इत्यादिबाबत ही समिती विचार करील" असा शासकीय प्रस्तावाचा आशय आहे. सामाजिक समता, सर्वधर्मसमभाव, संतांच्या जीवनदर्शनाचे संस्कार, अनेक धर्मपंथांचा व त्यांच्या तत्वज्ञानांचा तौलनिक अभ्यास, महाराष्ट्र-संतांच्या कार्याचा विशेष अभ्यास व संशोधन, सद्गुण संवर्धन व राष्ट्रीय चारित्र्य निर्मिती, राष्ट्रीय एकात्मता आणि एकंदरीने पुरोगामी मानवतावादी मानवधर्मसंस्कार होतकरू तरुण पिढीला देण्याचे ज्ञानदानाचे कार्य संतपीठाकडून यथाशक्ति व्हावे असे संतपीठाचे उद्दिष्ट आहे.

सर्व प्राणिमात्राकडे भूतदयेने व आत्मौपम्यभावाने पहावे या संतदर्शनांत हे सर्व पैलू कमी अधिक प्रमाणात पहावयास मिळतात याचा उल्लेख आम्ही दुसऱ्या प्रकरणांत केला आहेच. महापुरूषांनाही देशकालपरिस्थितीचे कांही संदर्भ व मर्यादा असू शकतात. त्यामुळे आजच्या निर्भेळ सामाजिक समतेच्या चष्म्यातून त्यांनी आणखी जास्त क्रांतिशील समताप्रस्थापनेचे प्रयत्न केले असते तर बरे झाले असते असे कोणी म्हणू शकेल. परंतु सहासातशे वर्षांपूर्वी जातिपेक्षा भक्तीला महत्व देणारे आणि वर्णवर्चस्वाची मक्तेदारी मोडून सर्वसामान्य आबालवृद्ध अशा सर्व जातिपंथाच्या थरातील लोकांना जागृत, संस्कारित आणि उन्नत करून काहींना तर असामान्य कवित्वाचा व साधुत्वाचा साक्षात्कार देणारे संतदर्शन आजही सामाजिक समता, सर्वधर्मसमभाव, आणि राष्ट्रीय एकात्मता या राष्ट्रीय महत्वाच्या प्रश्नाबाबत प्रेरक ठरेल यात शंका नाही. भक्ति येथ सारे। जाति अप्रमाण।। नाही वर्ण नाही याति नाहीयां वेदोक्ती। नामेंचि संतृप्ति होत जीवा। अभक्त ब्राह्मण जळोत्याचे तोंड काय ऐसी रांड प्रसवली। वैष्णव चांभार धन्य त्याची माता। शुद्ध उभयता कूळजाति। सर्वांभूति समदृष्टि। हेचि भक्ति गोड मोठी।। एकनाथांच्या ब्राह्मण-महार संवादात ब्राह्मण म्हणतो 'तुझ्या बापाचे भय काय? तर महार म्हणतो तुमचे आमचे बाप एक हाय" चोखोबा म्हणतात ऊस

डोंगा परी रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा। चोखा डोंगापुरी भाव नोहे डोंगा। काय भूललासी वरलिया सोंगा। ही वागनीदाखल दिलेली संतवचनें आजही सामाजिक समतेच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने क्रांतिकारी व प्रेरक ठरतील. आजहि स्वराज्य-प्राप्तीनंतरही व अनेक वर्षे कायदे, शिक्षण, विकास कार्य प्रगत असूनही महाजनहरिजन, आदिवासी शहरवासी,स्त्रीपुरुष असें असह्य विषमतेचे भयंकर स्वरूप काही ठिकाणी प्रत्यक्ष पहावयास मिळते. संतमहात्म्यांचा लोकमानसावर जो पगडा आहे त्यांच्या समतावादी जीवनदर्शनाचा परिणाम समता प्रस्थापनेच्या दृष्टीने अधिक प्रभावी होईल ही संतपीठाकडून अपेक्षा आहे. संतपीठाचे ते प्रमुख उद्दीष्ट आहे.

आज जातिधर्माच्या कडव्या असहिष्णुवृत्तीमुळे त्या वृत्तींना खतपाणी घालणाऱ्या देशविरोधी शक्ति देशद्रोही कारवाया करीत असल्यामुळे सर्वधर्मसमभाव आणि राष्ट्रीय एकात्मता यावर भर देऊन राष्ट्रनिष्ठ तरुणांचा व लोकांचा संच सर्व जातिधर्मीतल्या थरांत निर्माण व्हावा हे सामाजिक शांतिस्थैर्याच्याच दृष्टीने नव्हे तर राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संरक्षणाच्या दृष्टीनेही अत्यंत निकडीचे झाले आहे. सर्वधर्म मानव कल्याणासाठी प्रवर्तित झालेआहेत. सर्वधर्माच्या तत्वज्ञानांत सर्वमानवमात्र एकाच सत्य तत्वाचे वा आत्मतत्वाचे अंशभाग आहेत याबद्दल ढोबळ्यामानानेएकवाक्यता आहे. सर्वधर्मातील नीतितत्वे एकच आहेत. असे असता तणाव होतात याचे कारण बहुतेक सर्वधर्मीचे अनुयायी जातिधर्मप्रमाण. मानतात नीतिधर्मप्रमाण मानीत नाहीत. म्हणून त्यांच्यात्यांच्या धर्माच्या थोर संस्थापकांचे व संत महात्म्यांचे विचार, नीतिविषयक कल्पना, त्यांची जीवनचरित्रे याचा यथायोग्यबोध जर आपण जिज्ञासू व समाजहितैषी लोकांना करून दिला तर समाजातील आपपरभाव कमी होऊन एकोपा व बंधुभाव वाढेल. हे आवश्यककार्य संतमहात्म्यांच्या जीवनदर्शनाच्या बौद्धिक व्यासंगाने व मानसिक सत्संगाने अधिक सुकर होईल. संतपीठाचे हे महत्वाचेउद्दिष्ट आहे. त्यासाठी सर्वधर्मपरिचय, सर्व धर्मीयांचे सांस्कृतिक सहजीवन, तौलनिक विधायक अभ्यास इत्यादि उपक्रमातून सर्वधर्मसमभावाचे उद्दिष्ट सफल होण्यास भरीव मदत होईल. सर्वधर्मसमभावाच्या संदर्भात शासनाने एक समितीही नियुक्त केली होती. समाजकारणांत आदर्श सर्वधर्मसमभावाचा

पाठ गांधीजींनी दिला व राजशक्तीच्या क्षेत्रात आदर्श सर्वधर्म समभावाच्या पाठ छत्रपति शिवाजी महाराज यांनी दिला. ज्ञानेश्वरानी या धर्मभेदाबद्दल म्हटले की धर्माधर्मीकिटाळ। त्यास अज्ञान हे मूळ। म्हणोनि त्याजिजे सकळ धर्मजात संतदर्शन, शिवदर्शन व मह्यत्मादर्शन आणि सर्व धर्मपंथांतीलअध्यात्मिक मानवधर्मपरंपरांचा वारसा तरुणपिढीपर्यंत पोहोचवावा हें संतपीठाचे कार्य अपेक्षित आहे.

सर्वधर्म हे मानधर्मान्नीच देशकाल-परिस्थितीनुसार रूपे आहेत. समाजातल्या कांहीं राजकीय सामाजिक अशा काही ऐतिहासिक संपर्क संघर्षात धर्मांच्या अनुयायांत कांही मतभेद झाले असले तरी याप्रासंगिक घटनांच्या पलीकडे जाऊन धर्मतत्वांचा,धर्मसंस्थापकांच्या जीवनदर्शनाचा व सर्वधर्म्रातील संतविभूतींचा मागोवा घेतला तर सर्वधर्मातील तत्वविचारांची व नीतिमूल्यांची एकवाक्यता लक्षांत येते. सर्वधर्माच्या परिचयातून व तौलनिक अभ्यासातून त्या त्या धर्माच्या खिडक्यातून एक व्यापक व सर्वसमावेशक मानवधर्माचा प्रकाशच सर्वांना उजळतो आहे याचा प्रत्यय येतो. यासाठी अभ्यास, संशोधन, तौलनिक मीमांसा या उपकारक ठरतील. सर्वधर्मांच्या तपशीलातील मतभेदांचा बाऊ करुन भेद वाढविण्यापेक्षा तपशीलात भेद ऐतिहासिक कारणांनी जरी झाले असले तरी सर्वधर्मांचे तप आणि शील एकच आहे हे ऐतिहासिक भाविक व चिकित्सक लोकांच्या मनोबुद्धीवर बिंबविण्यासाठी या तौलनिक अभ्यासाची गरज आहे. संतपीठाकडून ही अपेक्षा आहे व संतपीठाचे तें एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

## उदात्त जीवन-मूल्यांचा संस्कार व प्रसार

संतपीठाचा प्रमुख उद्देश संतसाहित्याचा व संतांच्या व विविध धर्मप्रवर्तकांच्या उदात्त मानवतावादी विचारांचा प्रसार करणें हा होय. संतसाहित्यातील सद्गुण-संवर्धन व दुर्गुण निराकरण या द्विसूत्रीवर समाजमानस केंद्रित करणे हाही संतपीठाचा एक महत्वपूर्ण उद्देश आहे. परधर्म-सहिष्णुतेचे विचार जोपासणे व त्याबरोबरच स्वधर्माच्या उदात्त मूल्याकडे लक्ष वेधणे हेही संतपीठाचे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. यातूनच राष्ट्रीय एकात्मता व परधर्म-सहिष्णुता ही आजच्या काळाची महत्वाची गरज आहे त्यासाठी या गोष्टी

उपकारक ठरतील. धर्मविचारांचे व संतविचारांचे महत्व लक्षात न घेतल्याने समाजामध्ये आज अनेक अपप्रवृत्ति रुजल्या व त्यामुळे देशाच्या विघटनेचे संकट आपल्यासमोर उभे राहिले. परस्परांच्या धर्माची मूलतत्वे समजून घेतल्यांस ही दरी नष्ट होईल यादृष्टीनें संतपीठ कार्य करू शकेल. यातून समाज-प्रबोधन साधण्याचाप्रयत्नही ही संस्था करील. उदात्त जीवनादर्श समाजासमोर ठेवणें व त्यातून समाजाचा व देशाचा•अभ्युदय साधणे हेहि या संस्थेचे उद्दिष्ट राहिल.

## संतसाहित्याची प्रसार माध्यमें

आज संतसाहित्य-प्रसाराच्या काही प्रकाशन संस्था आहेत वा काही माध्यमे आहेत. संतांच्या तत्वज्ञानाची शिकवण देणाऱ्या काही संस्था आहेत. सर्वधर्मांचे प्रचारक आपापल्या परीने व्याख्यान, प्रवचन, भजन, गझल कवाली, कीर्तन इत्यादि अनेक माध्यमातून धर्मप्रचाराचे काम करीत आहेत. त्यांचा नीटसा उपयोग केला जात नाही. त्यातून काही वेळेला अंधश्रद्धेचे पोषण होते तर काही वेळा स्वधर्माच्या अभिनिवेशामुळे परधर्माबद्दलच्या उचित मतांचा प्रसार केला जात नाही. याप्रचार माध्यमांचा चांगला विधायक उपयोग आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी कसा करता येईल याचाही विचार संतपीठ करील. त्यासाठी आवश्यक तर काही कार्यशाळा, शिबिरे, चर्चासत्रे यांचे आयोजन करून ही संस्था समाजाच्या मनावर खोलवर परिणाम करणाऱ्या प्रचारमाध्यमांना सुयोग्य रूप देऊन परिणामकारक व समाजहितकारक उपयोग करून घेण्यासाठी काही योजनांची आखणी करून त्या कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

## अध्ययन संशोधनासाठी परीक्षा

संतसाहित्याचे अध्ययन - अध्यापन हे संतपीठाचे प्रमुख उद्दिष्ट असेल. यासाठी विविध परीक्षांची आखणी ही संस्था करील. आज महाराष्ट्रांत निखळ संतवाङ्‌मयावर आधारित परीक्षा घेतल्या जात नाहीत. यासाठी संतपीठ—

(१) संतसाहित्य प्रचार परीक्षा.

(२) संतसाहित्यविषयक पदव्युत्तर परीक्षा.

(३) संतसाहित्य संशोधनार्थ परीक्षा.

इत्यादि परीक्षांचे आयोजन करील.

या परीक्षांचा अभ्यासक्रम, कालावधि, त्यांची स्वरूप वैशिष्ट्ये यांचा तपशीलवार विचार या अहवालाच्या स्वतंत्र प्रकरणांत केला आहे. संतसाहित्याचा परिचय, संतसाहित्याचे अध्ययन, आणि संतसाहित्याचे संशोधन अशी त्रिविध उद्दिष्टे या परीक्षांचा माध्यमांतून संतपीठ साध्य करील.

## संत साहित्याचे जतन

संत साहित्याचे जतन हेही संतपीठाचे एक महत्वाचे कार्य आहे महाराष्ट्रात विविध धर्मांची धर्म संप्रदायाची हस्तलिखिते मठामंदिरांत व दर्ग्यात विखुरली आहेत. त्यांचा शोध घेणे व त्यांचे जतन एका अद्यावत अशा हस्तलिखितसंग्रहालयात करून ती अभ्यासकांना उपलब्ध करून देणेही आजच्या काळाची गरज आहे. काही हस्तलिखिते गावोगाव धूळ खात पडली आहेत व काही दुर्लक्ष झाल्यामुळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जीर्ण पोथ्यांना लॅमिनेशन करून त्यांचे नीट जतन करणेही अवश्य आहे. त्याचप्रमाणे मिळविलेल्या हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची करून ती प्रसिद्ध करण्याचे कार्यही संतपीठ हाती घेईल. महाराष्ट्रातील विविध सांप्रदायिक संशोधन संस्थांस उपलब्ध असलेल्या हस्तलिखित सूचींची एक बृहद्सूची तयार करण्याचे कार्यही संतपीठ करील. अशा प्रकारचे कार्य अद्यापि महाराष्ट्रांत झालेले नाही.

### संशोधनास प्रोत्साहन

(१) संतपीठाचे स्वतःचे संतसाहित्य संशोधन विषयक प्रकल्प असतील त्यांत पुढील बाबींचा अंतर्भाव असेल.

अ) विविध धर्मांचा तौलनिक अभ्यास

आ) विशिष्ट धर्माचा / धर्मसंप्रदायाचा विशेष अभ्यास

इ) विशिष्ठ संतांच्या साहित्याचा विशेष अभ्यास.

ई) विविध संतांच्या साहित्याचा तुलनात्मक अभ्यास

उ) संतसाहित्यातील वाङ्मय प्रकारांच्या उद्‌गम व विकासाचा अभ्यास

ऊ) विविध धर्मसंप्रदायांचा तुलनात्मक अभ्यास

ए) विविध धर्मांच्या, धर्मसंप्रदायाच्या साहित्यात प्रकटलेले राष्ट्रीय एकात्मतेचे, व मानवतावादाचे स्वरूप

ऐ) संतसाहित्य व समाजप्रबोधन यांच्या अन्योन्य संबंधाचा अभ्यास.

ओ) संतसाहित्याशी संबंधित अन्य समस्यांचा अभ्यास.

(२) संतसाहित्याचे विशेष अध्ययन करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांच्या संशोधनावरील प्रकल्पाना मान्यता देऊन त्यांना प्रोत्साहन व अनुदान देण्याचे कार्यही संतपीठ करू शकेल.

## प्रकाशनकार्य व त्यास प्रोत्साहन

संतपीठ महत्वपूर्ण संतसाहित्याचे संशोधन संपादन प्रकाशित करील. त्याच प्रमाणे अन्य संतसाहित्याभ्यासकांच्या एतद्विषयक साहित्यास काही प्रमाणात अनुदान देईल. त्यामुळे संतसाहित्याच्या अनेक अप्रकाशित व दुर्लक्षित पैलूंवर प्रकाश पडेल. विविध धर्माच्या संतांच्या परिचयावर पुस्तिकांचे प्रकाशनही करण्यांत येईल.

## समृद्ध ग्रंथालय

सर्वसंतसाहित्यविषयक ग्रंथ मिळवून ते अध्ययन संशोधनार्थ अभ्यासक / संशोधकांना उपलब्ध करून देण्यासाठी एका समृद्ध ग्रंथालयाची उभारणी संतपीठ करील. या ग्रंथालयाला संस्थेचे हस्तलिखित संग्रहालय जोडलेले असेल. ग्रंथालयात दुर्मिळ संदर्भग्रंथ व नियतकालिकांचे जुने अंक यांचाही उपयुक्त असा संग्रह करण्यांत येईल. वाचनकक्ष व संशोधनकक्ष यांचीही व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे छायाप्रती झेरॉक्सिंग करण्याचीही व्यवस्था करण्यात येईल.

## चर्चासत्रे, व्याख्यानमाला, शिबिरे, कार्यशाळा

चर्चासत्रे, व्याख्यानमाला, शिबिरे, कार्यशाळा, विशिष्ठ मुदतीचे अभ्यासवर्ग, या माध्यमांच्या द्वारा संतसाहित्याच्या प्रसाराचे व त्याच्या यथायोग्य मूल्यमापनाचे व समाज प्रबोधनाचे कार्य हाती घेण्यात येईल. या गोष्टी अनेक ठिकाणी करता येण्यासारख्या असल्याने विस्तारित क्षेत्रात समाजप्रबोधन करण्याचे उद्दिष्ट साधता येईल.

## सांप्रदायिक संत साहित्य अभ्यास संस्थांचे संलग्नीकरण

वारकरी शिक्षण संस्था, भागवतधर्म शिक्षण देणाऱ्या संस्था, अ. भा महानुभाव परिषद, एकनाथ संशोधन मंदिर, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, इस्लाम धर्मांची शिकवण देणाऱ्या संस्था धर्मग्रंथ व संतसाहित्यविषयक कार्य करीत आहेत. या संस्थांची इच्छा असल्यास त्याना संतपीठाशी संलग्न होता येईल व त्यातून सर्वधर्मसमभाव व एकात्मतां यांच्या वृद्धीस अधिक चालना मिळेल. या संलग्नीकरणाने सर्व धर्मशाखाना मूळव्यापक मानवधर्माचा संदर्भ मिळेल. त्यांच्या कार्यास या भूमिकेवरून प्रोत्साहन अनुदान देण्याचे कार्य संतपीठ करू शकेल. आजही अनेक मानवतावादी विचारवन्त मानवधर्माचे शिक्षण संस्कार देत आले आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे गुरूदेव सेवा मंडळ, गाडगे महाराजमिशन, गीता मिशन, पांडुरंगशास्त्री आठवले यांचे स्वाध्याय मंडळ, अनेक सत्पुरूषांच्या भक्तीने चाललेल्या सेवा संस्था या सर्वांचे संघटन व समन्वय करण्यात संतपीठ पुढाकार घेऊ शकेल. या संस्था संघटनांचा प्रतिसाद या कार्यास मिळवण्याचा संतपीठ प्रयत्न करील. या सर्वांच्या समन्वय, सहकार्यामुळे समाज प्रबोधन प्रभावी रीतीने होऊ शकेल. सर्वधर्मसांप्रदायात दलित व महिला संतांच्या कार्याचा विशेष अभ्यास त्या दृष्टीने अधिक फलदायी होईल. त्याचप्रमाणे सर्व धर्मातील साधूसंत 'औलिया (मुस्लिम संत) तत्वज्ञानी, विचारवन्त यांनी संकुचित जातिधर्म-पंथनिरपेक्ष व्यापक मानवधर्माची जी शिकवण दिली आहे त्यांचा विशेष अभ्यास उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने लाभदायी ठरेल. त्या त्या धर्माच्या शिक्षण संस्कारासाठी व धर्मोपदेशक तयार करण्यासाठी काही संस्था काम करीत आहेत. त्यांच्या शिकवणीचे स्वरूप, ते अभ्यासक्रम याची माहिती घेऊन त्यातील स्वतःच्या धर्माच्या अहंगडाऱ्या व दुसऱ्या धर्माबद्दलच्या दुराव्याचा भाग दूर करुन त्या त्या धर्माचे शिक्षणही समाजाच्या एकोप्याला आणि परस्पर स्नेहभावाला पूरक कसे होईल यासाठी संतपीठाला भरीव कार्य करता येईल. भिन्न भिन्न धर्माच्या प्रचारकांच्या धार्मिक प्रबोधनाच्या राष्ट्रिय व सामाजिक हिताच्या दृष्टीने समन्वय करण्याच्या बाबतीत संतपीठाचे सर्वधर्मसमभावी आचार्य मौलिक कामगिरी बजावू शकतील.

# संतपीठाचे स्वरूप

वरील सर्व उद्दिष्टांची पूर्तता करता येईल असेच संतपीठाचे स्वरूप असले पाहिजे हे उघड आहे. या संतपीठाच्या शिक्षणाचे संस्कार घेतलेले पदवीधर इतर विद्यापीठाच्या पदवीधरापेक्षा अधिक संस्कारक्षम, अधिक ध्येयवादी, अधिक सेवाभावी, जीवनमूल्यांना अधिक जपणारे असे होतील तरच संतपीठाचे उद्दिष्ट सफल झाले आहे असे मानता येईल. ज्या पुण्यपावन पैठण क्षेत्राची संतपीठासाठी शासनाने निवड केली आहे, ते क्षेत्र धर्मज्ञानाच्या बाबतींत दक्षिणेची काशी म्हणून नावाजलेले होते. तेथे मानवतेच्या भूमिकेवरून ज्ञानेश्वरादिसंतांनी धर्माचे पुनरूज्जीवन केले व एकनाथांनी अंतर्बाह्य समताधर्माचा साक्षात्कार दाखविला. आधुनिक काळांत हेच कार्य त्या महासंतांच्या साधुत्वाच्या व साहित्याच्या आधारे पैठणच्या संतपीठाला करावयाचे आहे. म्हणूनच यः क्रियावान् सपंडितः। या न्यायाने समाजसेवेची प्रत्यक्ष क्रिया वा कार्य या पीठातून सुशिक्षित झालेल्या पदवीधरांनी करावे व आत्महित आणि समाजहित ह्यांचा समन्वय आपल्या जीवनातून व्यक्त करावा अशी संतपीठाकडून अपेक्षा आहे. संतपीठ हे केवळ शिक्षणाचे ज्ञानपीठ न राहाता मानवता संस्काराचे दीक्षापीठ व्हावे' हा संतपीठ प्रस्थापनेचा हेतू आहे. म्हणून स्वधर्मनिष्ठेबरोबरच परधर्मसहिष्णुतेची व सर्वधर्मसमभावाची प्रचीती देणारे, स्वहिताबरोबरच समाजहितासाठी प्रयत्नशील असणारे, जीवनविकासाला प्राधान्य देणारे समाजाच्या सुखदुःखात आत्मौपम्याने समरस होणारे आणि आध्यात्मिक मानवधर्माची दीक्षा घेऊन आपल्या चारित्र्याने छात्रप्रबोधन व समाजप्रबोधन करू शकतील अशाच अध्यात्मसाधक समाजसेवक आचार्य, प्राचार्यांचा योजनाबद्ध समावेश संतपीठात करून त्याद्वारे उद्दिष्टांची पूर्तता करू शकेल असे संतपीठाचे स्वरूप राहील.

आज अनेक शिक्षणसंस्था १९६० च्या सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट प्रमाणे निर्माण झालेल्या आहेत व त्या सार्वजनिक विश्वस्त कायद्याप्रमाणे नोंदल्या गेल्या आहेत. विद्यापीठे ही शासकीय कायद्यांनी अस्तित्वांत आहेत. संतपीठ ही शिक्षणसंस्था असल्याने स्वयंसेवी विश्वस्त संस्था म्हणूनही निर्माण करता येईल. संबधित खात्याशी विचारविनिमय करून घटनेचा तपशील ठरवता येईल. रामकृष्णमिशन भारतीय विद्याभवन, श्रीसत्यसाई इन्स्टीट्यूट इत्यादि संस्था महनीय

कार्य करीत आहेत. श्रीसत्यसाई इन्स्टिट्यूट ऑफ हायर लर्निंग ही संस्था या मानवधर्म संस्काराच्या दृष्टीने प्रभावी कार्य करीत आहे. त्याच धर्तीवर संतपीठाची घटना व संघटना असावी असे आम्हांस वाटते. संतपीठ ही शिक्षणकार्यास पूरक अशी संघटना असल्याने नेहमीच्या शिक्षणपद्धतीतील कला, वाणिज्य, विज्ञान अशा महाविद्यालयाच्या स्थापनेत वा संचालनात संतपीठ जाणार नाही. मात्र त्या उच्चशिक्षणाच्या संदर्भात सत्यसाई संस्थेने जीवनमूल्य संस्कार शिक्षणाचे जे उपक्रम यशस्वीरीत्या चालविले आहेत त्यांचा आपल्या परिस्थितीनुसार उचित बदल करून संतपीठांत समावेश चांगल्या प्रकारे करता येईल.

●●●

# प्रकरण पाचवे

## अभ्यासक्रम व परीक्षा!

संतपीठाच्या अभ्यासक्रमाचा विचार करताना मागच्या प्रकरणात विशद केल्याप्रमाणे त्या उद्दिष्टांची पूर्ति होईल असाच अभ्यासक्रम कार्यान्वित करावा लागेल. तिसऱ्याप्रकरणांत राधाकृष्णन आयोग व कोठारी आयोग या राष्ट्रीय व शैक्षणिकदृष्ट्या महत्वाच्या अशा कमिशनच्या अध्यात्मिक, नैतिक व मूल्यशिक्षणसंस्कारासंबंधीच्या शिफारशींचा गोषवारा आम्ही दिला आहे. त्या शिफारशी कार्यान्वित करणाच्या दृष्टीने संतपीठाचा अभ्यासक्रम राहील. शालेय शिक्षणक्रमात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणक्रमांत संतपीठ काय करू शकेल याची रूपरेषा आम्ही पुढे देत आहोत. संतपीठ प्राथमिक वा माध्यमिक विद्यालय सुरू करण्याचा वा चालविण्याचा उपक्रम हाती घेणार नाही. विद्यमान प्राथमिक व माध्यमिक शाळांतून नीतिमूल्य संस्कारशिक्षण कसे समाविष्ट करता येईल या दृष्टीने संतपीठ प्रयत्न करील. मुख्यतः शालेय शिक्षकांना नीतिमूल्य शिक्षण अध्यापनाच्या दृष्टीने, प्रशिक्षण तयार करणे हे संतपीठाचे कार्य राहील.

## प्राथमिक शिक्षण

संवेदनाशील संस्कारक्षम बालमनावर निरागस सद्भाव संतवचनांचा व संतकथांचा ठसा सहजतेने व सुगमतेने उमटणे अधिक शक्य व आवश्यक आहे. अगदी बालबोध सोप्या व आकर्षक भाषेतील संतकथा, सर्व धर्मातील प्रार्थना आणि नीतीबोध, नीतिभक्ती प्रधान संतसुभाषिते, संतवाङ्मयातील उपदेशपर समर्पक दृष्टांत, परोपकारी विक्रम कथा, सर्व धर्मांच्या संस्थापकांच्या व संताच्या सुबोध कथा, संतसाहित्यातील सारग्राही वेचे, सानेगुरूजीसारख्यांच्या गोडगोड गोष्टी, सानेगुरूजी कथामालेसारखे रंजक व बोधक उपक्रम इत्यादि गोष्टी प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात जाणीवपूर्वक समाविष्ट करता येतील. त्यासाठी यथोचित साहित्यनिर्मितीचे काम संतपीठ करू शकेल. बालसंस्कार वाङ्मय निवडून वा तयार करून दृकश्राव्य माध्यमातून बालमनांवर सुसंस्काराचे बीजारोपण करण्याचे उपक्रम यशस्वी करण्यास संतपीठ साहाय्यभूत होऊ शकेल. प्राथमिक शिक्षकांना शालेय अध्यापन कार्यात हा संस्कारबोध चांगल्या प्रकारे देता यावा म्हणून त्याना संस्कार बोधपाठाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षकांचे नैतिक शिक्षण संदर्भातील प्रशिक्षण संतपीठ करू शकेल, शाळातून मनोरंजनाबरोबरच सद्‌गुणसंवर्धन होऊ शकेल असे सार्थ सांस्कृतिक कार्यक्रम शाळांतून आयोजित केले तर बालमनाच्या विकासास ते साहाय्यभूत ठरेल. ज्या परिसरातील शाळा आहे. त्या परिसरांत सर्व धर्मांची देवस्थाने त्यांच्या यात्रा, उरूस, उत्सव त्या भागातील संतसज्जनांच्या वीरपुरूषांच्या आणि कलावन्ताच्या आठवणी करून देणारी स्थळे इत्यादीकाशी कुतूहलपूर्ण जवळीक बालमनाला साधता येईल असे उपक्रमही आयोजित करणें श्रेयस्कर ठरेल. अभंग व प्रासादिक संगीत काव्यगायनाचा परिणामही बालमनावर अधिक सहजतेने होऊ शकेल. या सर्व उपक्रमासाठी पुस्तकांची निर्मिती प्राथमिक शिक्षकांचे प्रशासन, विविध सांस्कृतिक कार्यासाठी कलावन्त धर्मप्रचारकाची उपलब्धि या गोष्टी संतपीठाला करता येतील. सर्व जातिधर्माच्या मुलांना खेळाचा, सहलीच्या सहाय्याच्या सहभोजनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आणि एकंदरीने सहजीवनाच्या रूपाने एकत्रित करून त्याची जातिधर्मनिरपेक्ष सहज मैत्रीची भावना सर्वक्षेत्रात विकसित करणे म्हणजे मानवतेचे संस्कार देणे होय. हे कार्य प्राथमिक

माध्यमिक वा उच्च अशा क्षेत्रातून कसे करावे याबाबत संतपीठ साहाय्यभूत होऊ शकेल.

## शालेय शिक्षण

शालेय शिक्षणाच्या संदर्भात श्री सत्यसाई बालविकास शिक्षण ट्रस्टतर्फे मानवीमूल्य शिक्षणाचा (Education in Human Values) उपक्रम अनेक राज्यातून सुरू झाला आहे. त्या धर्तीवर संतपीठाला महाराष्ट्रांत काम करता येईल. मानवीमूल्यशिक्षण कोर्स प्राथमिक शिक्षकासाठी सुरू करण्यात आला व देशांतील चवदा राज्यातून पाचहजार शिक्षक प्रशिक्षित करण्यात आले. त्या त्या राज्याच्या शिक्षणखात्यानी त्या कोर्सला मान्यता दिली. पाच दिवसाचा हा कोर्स आहे त्या शिक्षकांच्या मार्गदर्शनासाठी प्राथमिक शाळातून मुलांसाठी, अभ्यासक्रम कार्यान्वित करण्यात येतो. सध्या देशांत दोन हजारावर असे वर्ग चालू असून पन्नास हजार विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत,

(१) स्वच्छता, शारीरिक सुदृढता, मनःशांति, सौजन्य यांच्या महत्त्वाची मुलांना जाणीव होईल.

(२) त्यांच्या वागणुकीत शिस्त येईल आणि घरातील बालयुवक या नात्याने, शाळेत विद्यार्थी या नात्याने आणि परिवारात मित्र या नात्याने पाळावयाच्या कर्तव्याची त्यांना जाणीव होईल.

(३) सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, आणि गरजू लोकांची सेवा, गरिबाबद्दल दया आणि ईश्वरावर श्रद्धा या मूल्यगुणांचा त्यांच्यात विकास होईल.

(४) जीवनास सामोरे जाण्याचे धैर्य त्यांच्यात येईल, कौटुंबिक व सामाजिक कर्तव्याची त्याना जाणीव होईल आणि आपले जीवन कृतार्थ बनविण्याचा ते कसून यत्न करतील.

मुलामध्ये असा विकास साधण्याच्या दृष्टीने हा कोर्स (अभ्यासक्रम) तयार करण्यात आला आहे. The main objective is to make the children absorb and develop human valuəs such as truth, right Conduct, peace, love and non-violence' 'मुंबई विद्यापीठाच्या प्राध्यापकांनी या अभ्यासक्रमाचे परीक्षण केले आणि असा निष्कर्ष काढला की The Balvikas Students show a more positive

attitude towards their parents, have a better adjustment to their environment and demonstrate a significant moral development and respect for all religions.

शाळेच्या अभ्यासक्रमात काही तास या मूल्यशिक्षणासाठी ठेवण्यात येतात आणि इतर विषय शिकवितानाही या मूल्यांचे अनुसंधान राखण्यांत येते. कथाकथन, सफरी, नाटक, धर्मग्रंथांच्या उताऱ्यांचे वाचन, शुभाषित व श्लोक कवितांचे पाठांतर प्रबोधनप्रदर्शने, थोर विभूतींचे चरित्रकथन इत्यादि विषयांचा अभ्यासक्रमांत अंतर्भाव करण्यात येतो. तो त्याबरोबरच मौन प्रार्थना, भजन आदि प्रासादिक कार्यक्रमांचा अवलंब करण्यांत येतो. बाबांच्या शब्दांत 'Man must make all effort to possess a body free' from vioent activitty, a tongue unpolluted by falsehood, hands free from causing injury and consciousness uncontaminated by evil thoughts'' मुलांना असा माणूस बनविण्याचे संस्कार देणारा हा अभ्यासक्रम आहे. त्यासाठी शिक्षक तयार वा प्रशिक्षित करण्याचे काम या अभ्यासक्रमाच्या धर्तीवर संतपीठ चांगल्या प्रकारे करू शकेल.

## माध्यमिक शिक्षण

माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावर हे कार्य अधिक सखोल व प्रभावी होऊ शकेल. अध्यात्मिक, नैतिक व वैचारिक उद्‌बोधक ग्रंथाची उपलब्धि मानवतावादी शिक्षण तयार करण्याच्या दृष्टीने माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण, अभ्यासक्रमात वैयक्तिक व सामाजिक नीती–मूल्यांचा संस्कार देण्यासाठी विभूतिचरित्रातील बोधप्रद प्रसंग बोधकथा, बोधपठ इत्यादिकांचा समावेश, बहिःशाल कार्यक्रमात संतविचार, सर्व धर्मसमभाव, सामाजिक समता यावर विषयावर भर या गोष्टी संतपीठाच्या माध्यमातून अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकतील. शाळामधून अनेक विषय असतात त्या विषयात संतदर्शन, सर्वधर्मपरिचय. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा इतिहास इत्यादि विषय समाविष्ट करता येतील. त्यासाठी अभ्यासक्रम निर्धारित करणे. पाठ्य पुस्तके तयार करणे, हे विषय शिकविणारे सुयोग्य शिक्षक तयार करणें हे काम संतपीठाला करता येईल. शिवाय शाळा ज्या ठिकाणी आहेत त्या परिसरात सर्वधर्माच्या प्रार्थना, सर्व जातीधर्माच्या लोकांची संमेलने, सर्व धर्माच्या उत्सवात विधायक सहभाग,

सामाजिक अभिसरण व सामाजिक बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी सहजीवनाचे उपक्रम इत्यादि गोष्टी संतपीठ व शिक्षणसंस्थाच्या समन्वित पुढाकाराने परिणामकारकपणे करता येतील.

## उच्च शिक्षण

शासनाने संतपीठ स्थापन करण्याची घोषणा केली. विद्यापीठाप्रमाणेच संतविद्येचे हे स्वतंत्र विद्यापीठ होणार का? त्याचे स्वरूप काय राहील, इत्यादि प्रश्नाबद्दल लोकमानसात उत्सुकता आहे. विद्यापीठाचा विचार शालान्त परिक्षेनंतरच होत असल्याने व उच्च शिक्षण हीच विद्यापीठाची कक्षा असल्याने संतपीठाच्या माध्यमातून उच्चशिक्षणाबाबत भरीव कार्य व्हावे अशी अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. संतपीठ संकल्पनेचा उद्देश लक्षात घेता त्या उद्देशाला धरून उच्चशिक्षणस्तरावर संतपीठाच्या कार्याचा विचार करावा लागेल. माणूस प्रकृतीने वाढतच असतो. त्याला संस्कृतीने वाढवावे हाच शिक्षणाचा उद्देश आहे. आजच्या उच्च शिक्षण पद्धतीत शिक्षण उच्च आहे. पण विद्यार्थी उच्चकोटीचा बनावा यावर भर नाही याची खंत अनेकांना वाटते आहे. व्यक्तिमत्वाचा विकास केवळ पुस्तकी वा बौद्धिक शिक्षणाने होऊ शकणार नाही शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या सर्वांच्या संतुलनातून व्यक्तित्व विकसित होत .असते.

## पदव्यूत्तर अभ्यासक्रम!

संतपीठाचा पदव्यूत्तर अभ्यासक्रम एकूण दोन वर्षांचा असेल यातील पहिल्या वर्षांत ६ प्रश्न पत्रिकांचा अभ्यासक्रम असेल प्रत्येक प्रश्नपत्रिका तीन तासाची असून तिला १०० गुण दिले जातील. वर्षाच्या शेवटी होणाऱ्या लेखी परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला सहा महिन्यांचा प्रात्यक्षिकाचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. प्रात्यक्षिकासाठी विद्यार्थ्यांनि ग्रामीण भागात जाऊन संतसाहित्यप्रसाराचे व समता एकात्मता नीतिमत्ता आदि मानवतावादी प्रबोधनाचे कार्य करावे अशी अपेक्षा आहे. त्यानंतर सहामहिन्यांत त्यास एक शोधप्रबंधिका सादर करावी लागेल. हे कार्य समाधानकारक रीत्या पूर्ण झाल्यावरच तो विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याचे घोषित केले जाईल. उत्तीर्ण श्रेणी - प्रथम ६० टक्के व त्यावर द्वितीय श्रेणी ५० टक्के व त्यावर तृतीय श्रेणी ४० टक्के व त्यावर अशा श्रेणी राहतील. या परीक्षेस बहि:स्थ

विद्यार्थ्यांनाही बसता येईल. यासंबंधीचा तपशील संतपीठाचे अभ्यासमंडळ ठरवील.

**प्रवेशपात्रता** - या अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठाचा पदवीधर प्रवेशपात्र राहील. त्याचप्रमाणे धर्मग्रंथांचा संतसाहित्याचा अभ्यासक वा प्रचारक पदवीधर नसला तरी त्याने त्यासंबंधी कांही पुस्तक लिहिले असेल वा तो प्रवचनकार, कीर्तनकार त्रा मानवतावादी नीतिधर्ममूल्याचा प्रचारक असेल तर त्यासही या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळू शकेल. प्रवेशेच्छूंची - पदवीधर वा प्रचारक या दोन्हींचीही प्रवेशाच्या अगोदर पात्रता परीक्षा घेतली जाईल व त्यात उत्तीर्ण होणारांना प्रवेश मिळेल. सर्वधर्मातील पुरोगामी जिज्ञासू व अभ्यासू स्त्रीपुरूषांना या अभ्यासक्रमांत वाव राहील, या अभ्यासक्रम शिक्षणाचे माध्यम मराठी राहील.

●●●

# अभ्यासक्रम व परीक्षा

संतवाङमयाचे योग्यरित्या अध्ययन - संशोधन व त्याचा प्रसार व्हावा या हेतूने संतपीठाने पुढील परीक्षा घ्याव्यात :-

अ) संतसाहित्याचा परिचय व्हावा, या हेतूने आयोजित केलेल्या परीक्षा.

आ) संतसाहित्याच्या विशेष अध्ययनाच्या हेतूने आयोजित केलेली पदव्युत्तर परीक्षा.

इ) संतसाहित्याच्या संशोधनार्थ आयोजित केलेली उच्चतम परीक्षा.

अ) या प्रकारच्या परीक्षांतील अभ्यासक्रमातून विविध धर्मातील मानवतावादी व समतावादी दृष्टिकोनाचे दर्शन घडावे व अध्ययन व्हावे अशी अपेक्षा आहे. संतसाहित्याबद्दल विद्यार्थ्यांत रूची निर्माण व्हावी. व त्यातील उदात्त मूल्यांकडे त्यांचे लक्ष वेधावे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय एकात्मतेची भावनाही निर्माण व्हावी ही अपेक्षा आहे.

या प्रकारच्या परीक्षा टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या किंवा महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या परिक्षांप्रमाणे विविध शैक्षणिक संस्थात घेतल्या जातील. या संस्थातच त्यांच्यासाठी वर्ग घेण्याची व्यवस्थाही करता येईल. यासाठी अभ्यासक्रमाची निश्चिती, प्राश्निक, परिक्षक नियुक्ती, परिक्षांचे संचलन इत्यादी बाबी संतपीठाच्या कार्यक्षेत्रातील असतील.

या परीक्षांचे तीन स्तर राहतील :-

१) प्राथमिक

२) माध्यमिक,

३) महाविद्यालयीन,

या परीक्षांचे नामकरण संतसाहित्य : प्रथमा, 'संतसाहित्य : मध्यमा', व संतसाहित्य : प्रवीण, असे करता येईल. या परीक्षांचा अभ्यासक्रम पुढील प्रमाणे. असेल :

(श्रेणीविभाजन नेहमीप्रमाणे - तृतीय श्रेणी - ३५ टक्के ते ४९ टक्के द्वितीय श्रेणी - ५० टक्के ते ५९ टक्के व प्रथम श्रेणी - ६० टक्के व त्यावर याप्रमाणे असेल.)

## अ) १) संतसाहित्य : प्रथमा :

या परीक्षेत एक प्रश्नपत्रिका असून ती १०० गुणांची असेल व ती दोन तासांची असेल.

### अभ्यासक्रम :

म. गौतम बौद्ध, भगवान महावीर, येशू ख्रिस्त, म. बसवेश्वर,
हजरत पैगंबर, झरत्रुष्ट, गुरु नानक, शंकराचार्य, ज्ञानेश्वर,
चक्रधरस्वामी. यांच्या चारित्र्याचा व शिकवणीचा अभ्यास. ३० गुण

### २) मराठी संतांच्या काही अभंगांचे पाठांतर

नामदेव, तुकाराम, चोखा मेळा व शेख महंमद २० गुण

### ३) दिलेल्या अभंगांचा अर्थ विशद करणे.

या अभंगाची निवड नामदेव, एकनाथ, तुकाराम, बहिणाबाई,
शेख महंमद यांच्या अभंगातून करावी. २० गुण

४) संतसाहित्याविषयी छोटासा निबंध लिहणे. ३० गुण

## अ) २) संत साहित्य : मध्यमा परिक्षा :-

या परीक्षेच्या अभ्यासक्रमात १०० गुणांची एक प्रश्नपत्रिका असावी व हा अभ्यासक्रम माध्यमिक शाळेच्या स्तरातील विद्यार्थ्यास झेपेल असा असावा.

**अ) पुढील संताच्या शिकवुणीचा अभ्यासक्रम** ३० गुण

श्रीगोविंदप्रभु, नामदेव, एकनाथ, तुकाराम, मन्मथस्वामी, लक्ष्मणमहाराज, चोखा मेळा, शहामुनी.

**आ दिलेल्या उताऱ्यांचे आकलन :** २० गुण

(हे उतारे ज्ञानेश्वरवचनामृत, डॉ. रा. द. रानडे) एकनाथवचनामृत, (डॉ. रानडे.) नामदेवांची भजने, (विनोबा) तुकारामवचनामृत (डॉ. रानडे.,) लक्ष्मणमहाराजांचे अभंग (प्रा. पसारकर,) इ. ग्रंथातील असावेत.)

**इ) कोणत्याही एका धर्म-धर्मसंप्रदायाचा स्थूल अभ्यास** २० गुण

(वारकरी, नाथ, रामदासी, जैन, वीरशैव, सूफी)

**ई) संतसाहित्यविषयक निबंध :-** ३० गुण

(संतसाहित्य व मानवता, संतसाहित्य व समाजप्रबोधन, संत साहित्य व राष्ट्रीय एकात्मता इ. सारखे विषय.)

## अ) ३) संतसाहित्य प्रवीण परिक्षा :-

ही परिक्षा महाविद्यालयीन स्तराची असेल, तिच्यात दोन प्रश्नपत्रिका (प्रत्येकी १०० गुणांच्या) असाव्यात.

### प्रश्नपत्र - १ :

१) एका संतकवीच्या साहित्याचा अभ्यास. ३० गुण

२) संतसाहित्यातील दिलेल्या उताऱ्याचे रसग्रहण. २० गुण

३) कोणत्याही दोन संप्रदायांचा तुलनात्मक अभ्यासक्रम
(वारकरी, महानुभाव, वीरशैव, जैन, नाव व रामदासी.) २० गुण

४) संतसाहित्यविषयक निबंध लेखन : ३० गुण
(संतांची समाजप्रबोधनाविषयक भूमिका, इस्लाम किंवा ख्रिस्ती किंवा बौद्ध धर्मांची मानवतावादी भूमिका, जैन किंवा बौद्ध धर्माचे वेगळेपण किंवा या स्वरूपाचे निबंध असावेत.)

## प्रश्नपत्र : २

१) महाराष्ट्रातील कोणत्याही एका धर्मसंप्रदायाच्या साहित्याचे स्वरुपदर्शन
(वारकरी, महानुभाव, दत्त, समर्थ, सुफी, वीरशैव, जैन इत्यादी.)- ५० गुण

२) संतसाहित्याची प्रसारमाध्यमे - २० गुण
(कीर्तन, प्रवचन इत्यादी)

३) संतसाहित्याच्या समाजावरील प्रभावाचा विचार - ३० गुण
राष्ट्राच्या उभारणीतील त्याचे महत्व इ. वर निकश.

## आ) पदव्युत्तर परिक्षा अभ्यासक्रम :

संतपिठाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम एकूण दोन वर्षाचा असेल. यातील पहिल्या वर्षात ६ प्रश्नपत्रिकांचा अभ्यासक्रम असेल. प्रत्येक प्रश्नपत्रिका तीन तासांची असून तिला १०० गुण दिले जातील. वर्षाच्या शेवटी होणाऱ्या लेखी परिक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक. लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला सहा महिन्यांचा प्रात्यक्षिकाचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. प्रात्यक्षिकासाठी विद्यार्थ्याने ग्रामीण भागात जाऊन संतसाहित्यप्रसाराचे कार्य करावे अशी अपेक्षा आहे. व त्यानंतर सहा महिन्यात एक शोधप्रबंधिका सादर करावी लागेल. हे कार्य समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यावरच तो उत्तीर्ण झाल्याचे घोषित केले जाईल.

**उत्तीर्ण श्रेणी :-** तृतीय श्रेणी - ४० टक्के ते ४९ टक्के,
द्वितीय श्रेणी - ५० टक्के ते ५९ टक्के व
प्रथम श्रेणी- ६० टक्के व त्यावर.

या परिक्षेस बहि:स्थ विद्यार्थ्यांनाही बसता येईल, त्या संबंधीचा तपशिल अभ्यास मंडळाने ठरवावा.

## प्रश्न १ :- भारताचा सांस्कृतिक इतिहास.

संदर्भ ग्रंथ : १) भारतीय संस्कृति - साने गुरुजी.
२) मऱ्हाटी संस्कृती - शं. बा. जोशी.
३) महाराष्ट्रीय संस्कृती - प्रा. शेणालीकर व प्रा. प्र. न. देशपांडे.
४) मध्ययुगीन धर्मसाधना - परशुराम चतुर्वेदी.
५) वैदिक संस्कृतीचा विकास - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.
६) मराठी संस्कृती - डॉ. इरावती कर्वे.
७) कुलदैवत - डॉ. सरोजिनी बाबर.
८) जनलोकांचा सामवेद - डॉ. सरोजिनी बाबर.
९) श्रावण भाद्रपद - डॉ. सरोजिनी बाबर.

## प्रश्न २ :- महाराष्ट्रातील विविध धर्मांचा अभ्यास.

(हिंदु, इस्लाम, जैन, बौद्ध, वीरशैव, ख्रिश्चन, शीख, पारशी इ.) कोणत्याही दोन धर्मांचा विशेष अभ्यास.

**संदर्भग्रंथ :-**
१) बायबल.
२) कुराण.
३) गुरुग्रंथसाहेब.
४) विनोबांचे - कुराणसार - इ. धर्मग्रंथसार सांगणाऱ्या पुस्तिका.
५) गीताई व गीताप्रवचने- विनोबा.
६) धम्मपद.
७) भारतीय दर्शनसंग्रह- पं. द. वा. जोग.
८) महावीरवाणी- सं. डॉ. भगवानदास तिवारी.
९) डॉ. आंबेडकर- धनंजय कीर.
१०) प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास-प्रा. र.म. भुसारी.
११) इस्लामी संस्कृति- सानेगुरुजी.

## प्रश्न ३ :- महाराष्ट्रीय धर्मसंप्रदाय व त्याचे साहित्य :-

### संदर्भग्रंथ :-

| | | |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्रातील पाच संप्रदाय- | डॉ. पं. रा. मोकाशी. |
| २) | संतसाहित्यचिंतन- | डॉ. यू. म. पठाण. |
| ३) | वारकरी संप्रदाय- उद्‌गम व विकास- | श्री. भा. पं. बहिरट. |
| ४) | नाथ संप्रदाय- | डॉ. रा. चिं. ढेरे. |
| ५) | दत्त संप्रदाय- | डॉ. रा. चिं. ढेरे. |
| ६) | नागेशसंप्रदाय- | डॉ. यू. म. पठाण. |
| ७) | समर्थ संप्रदाय- | शंकरराव देव. |
| ८) | जैन धर्म व संस्कृती- | प्रा. सुमेर जैन. |
| ९) | वीरशैव मराठी साहित्य- | डॉ. मोगलेवार. |
| १०) | प्राचीन मराठी जैन वाङ्मय- | डॉ. सुभाषचंद्र अवकोळे. |
| ११) | महानुभाव पंथ व त्याचे वाङ्मय- | डॉ. शं. गो. तुळपुळे. |
| १२) | महानुभाव साहित्य संशोधन- | डॉ. यू. म. पठाण. |
| १३) | शोधणी- | डॉ. यू. म. पठाण. |
| १४) | वारकरी पंथाचा इतिहास- | सोनोपंत दांडेकर. |

## प्रश्न ४ :- जीवनमूल्य विचार :-

### पुढील विषयांचा अभ्यास -

धर्म व राष्ट्रीय एकात्मता.

धर्म व नीतिमूल्ये.

धर्म व समाजपरिवर्तन.

धर्म व सामाजिक बांधिलकी, सामाजिक न्याय, सामाजिक समता.

धर्म - धर्मपंथाची प्रसार-माध्यमे, व त्यांचा राष्ट्रीय एकात्मतेसाठी उपयोग.

सर्वांगीण ग्रामविकास.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा वैचारिक इतिहास.

## प्रश्न ५ :- भारतीय विचारवंतांचे तत्वनिवेदन :-

महात्मा गांधीजी, विनोबा, महात्मा फुले, आगरकर, वि. रा. शिंदे, लोकहितवादी, डॉ. आंबेडकर, आचार्य जावडेकर, साने गुरुजी, तुकडोजी महाराज, गाडगे महाराज, राजाराम मोहनरॉय, रविंद्रनाथ टागोर, दादा धर्माधिकारी, काका कालेलकर, विवेकानंद.

**संदर्भग्रंथ :-**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक भारत | - | जावडेकर, |
| संस्कृती के चार अध्याय | - | डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी. |
| प. फुले समग्र ग्रंथ | - | सं. धनंजय कीर, |
| वि. रा. शिंदे लेखसंग्रह | - | डॉ. मा. मंगुडकर. |
| लोकहितवादी - काल आणि कर्तृत्व | - | डॉ. फडकुले |
| डॉ. आंबेडकर | - | सं. धनंजय कीर |
| डॉ. आंबेडकर चरित्र | - | चां. भं. खैरमोडे, खं. १ ते ६ |
| आगरकर लेखसंग्रह | - | साहित्य अकादमी प्रकाशन |
| प्रबोधनातील पाऊलवाटा | - | डॉ. फडकुले |
| ग्रामगीता | - | तुकडोजी महाराज |

## प्रश्न ६ :- एका संताच्या साहित्याचा विशेष अभ्यास :-

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, रामदास, बसवेश्वर, जनाबाई, मुक्ताबाई, बहिणाबाई, यांपैकी एक.

## इ) संतसाहित्याचार्य पदवी संशोधन :-

अ) या पदवीसाठी संतपीठाची पदवी (संतसाहित्यप्रवीण) वा एम.ए. समकक्ष पदवी धारण करणाऱ्या व्यक्तीस प्रवेश द्यावा.

आ) या पदवीच्या संशोधनाचा किमान कालखंड दोन वर्षांचा असावा.

इ) यासाठी संतपीठाने मार्गदर्शक नियुक्त करावेत.

ई) प्रबंध पूर्ण झाल्यावर संतपीठाने परीक्षक नियुक्त करावेत व त्यांचे• अहवाल समाधानकारक असल्यास मौखिक परिक्षेनंतर सदर पदवी देण्यात यावी.

वरील बाबीसंबंधीचा अधिक तपशील संतपीठाच्या अभ्यास मंडळाने निश्चित करावा.

## संशोधन :-

संतपीठाच्या वतीने पुढील प्रकारचे संशोधन करण्यात येईल.

१) विविध संशोधन प्रकल्प.

२) पीएच्.डी. समकक्ष - संतसाहित्याचार्य - या पदवीसाठी प्रबंध सादर करणे.

## १) विविध संशोधन प्रकल्प :-

या प्रकल्पान्तर्गत पुढील संशोधन करता येईल.

अ) विविध धर्मांचा वा धर्मसंप्रदायांचा तुलनात्मक अभ्यास.

आ) विशिष्ट संतांचा व त्यांच्या साहित्याचा अभ्यास.

इ) विशिष्ट धर्म, धर्मसंप्रदायाचा अभ्यास

ई) संतसाहित्यातील विशिष्ट वाङ्मय प्रकाराचा अभ्यास

ए) संतसाहित्याशी संबंधित अन्य विषय.

ऐ) संतसाहित्याच्या प्रमाणित संहिताचे प्रकाशन.

●●●

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई